रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १७ ◆ अंक १८५
www.ramprahar.com
# राम प्रहर
सोमवार, २० जानेवारी २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

अंतरंग

महाकुंभमेळ्यात भीषण आग, अनेक तंबू जळून खाक/२
मोहोपाड्यातील शिवनगर येथून बांगलादेशी नागरिकास अटक/५
टी-२० वर्ल्डकपमध्ये भारतीय संघाची दणदणीत सलामी/८

## भारताचा महिला खो-खो संघ ठरला वर्ल्ड चॅम्पियन



**नवी दिल्ली :** पहिल्यावहिल्या खो-खो विश्वचषक स्पर्धेत भारतीय महिला संघाने नेपाळचा ७८-४० असा ३८ गुणांनी पराभव करून विश्वविजेतेपद पटकावले आहे. महाराष्ट्राची लेक प्रियांका इंगळेच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाने सुरुवातीपासूनच दमदार कामगिरी दाखवत रविवारी (दि. १९) रंगलेल्या अंतिम सामन्यातही नेपाळला एकतर्फी मात दिली. कर्णधार प्रियांका व इतर खेळाडूंनी चमकदार खेळी केली. स्पर्धेतील एकही सामना न गमावता त्यांनी जेतेपदाच्या ट्रॉफीवर नाव कोरत नवा इतिहास रचला आहे. विश्वविजेत्या संघाचे अभिनंदन होत आहे.

# उरणमधील चिरनेर येथे बर्ड फ्लू

## कुक्कुट पक्ष्यांत आढळला एव्हियन इन्फ्लुएंझाचा प्रादुर्भाव

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील चिरनेर येथे परसदारातील कुक्कुट पक्ष्यांमध्ये एव्हियन इन्फ्लुएंझा अर्थात बर्ड फ्लू या रोगाचे विषाणू आढळले आहेत. त्यामुळे रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी येथील एक किमीपर्यंतचा परिसर बाधित क्षेत्र व एक ते दहा किमीपर्यंतचा परिसर सर्वेक्षण क्षेत्र म्हणून घोषित केला आहे.

### १० किमीपर्यंतचा परिसर सर्वेक्षण क्षेत्र घोषित



चिरनेर येथे कुक्कुट पक्ष्यांमध्ये मरतुक आढळल्याने रोग निदानासाठी नमुने पुणे येथील भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी रोग अन्वेषण विभागाकडे पाठवण्यात आले होते. तेथून हे नमुने भारतीय कृषी संशोधन परिषद अंतर्गत मध्य प्रदेशातील भोपाळ येथील राष्ट्रीय उच्च सुरक्षा पशुरोग प्रयोगशाळेत पाठवण्यात आले होते. या प्रयोगशाळेने कुक्कुट पक्ष्यातील मरतुक एव्हियन इन्फ्लुएंझा अर्थात बर्ड फ्लू पॉझिटिव्ह आल्याचे कळवले आहे. (पान २ वर..)

### रोगस्थिती नियंत्रणात, पण सतर्कतेचे आवाहन

बर्ड फ्लू या रोगाचे विषाणू आढळल्याच्या पार्श्वभूमीवर पशुसंवर्धन, आरोग्य, महसूल, ग्रामविकास, पोलीस, वनविभाग, परिवहन इत्यादी विभागांच्या समन्वयाने बाधित क्षेत्रात कृती आराखड्याप्रमाणे कारवाई करण्यात येत आहे. रोगस्थिती नियंत्रणात असून कुक्कुट व्यावसायिक व नागरिकांनी घाबरून न जाता सतर्कता बाळगण्याचे आवाहन पशुसंवर्धन विभाग व जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# पनवेलच्या शिवकरमध्ये विकासाचे महापर्व

## दोन कोटी ८२ लाख रुपयांच्या विविध कामांचे भूमिपूजन | आमदार प्रशांत ठाकूर व तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते शुभारंभ



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील शिवकर ग्रामपंचायत हद्दीत करण्यात येणाऱ्या तब्बल दोन कोटी ८२ लाख ६७ हजार रुपयांच्या १० विकासकामांचे भूमिपूजन कार्यसम्राट व लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर आणि भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते रविवारी (दि. १९) करण्यात आले.



आमदार प्रशांत ठाकूर यांचा स्थानिक विकास निधी, २५:१५, अल्पसंख्याकबहुल ग्रामीण समाज विकास आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनेचा निधी विकासकामांसाठी उपलब्ध करण्यात आला आहे.

या कार्यक्रमास भाजपचे तालुका सरचिटणीस व माजी जिल्हा परिषद सदस्य राजेंद्र पाटील, तालुका सरचिटणीस व माजी पंचायत समिती सदस्य भूपेंद्र पाटील, मागासवर्गीय सेलचे जिल्हाध्यक्ष व माजी जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव, नेरे विभागीय अध्यक्ष सुनील पाटील, पळस्पे विभागीय अध्यक्ष अनेश ढवळे, विचुंबे सरपंच प्रमोद भिंगारकर, सदस्य अविनाश गायकवाड, सुकापूर उपसरपंच महेश पाटील, शिवकर ग्रामपंचायत सरपंच आनंद ढवळे, उपसरपंच रवींद्र ढवळे, माजी उपसरपंच प्रांजल ढवळे, सदस्य मंगेश ढवळे, रितू पाटील, सुरेखा टोपले, रेश्मा पाटील, मनिषा पाटील, मोनिका पोपेटा, संतोष मते, भास्कर पाटील, शंकर महाराज, भरत टोपले, भरत चौधरी, तुकाराम तुपे, बबन ढवळे, गोटीराम ढवळे, गोपीनाथ ढवळे, नजिर शेख, खलील शेख, रमजान शेख, सय्यद शेख, परशुराम ढवळे, अविनाश ढवळे, अरविंद फडके, प्रवीण फडके, सागर ढवळे, अरविंद माळी, निलेश महाराज, समीर पोपेटा, उत्तम पाटील यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शिवकर ग्रामपंचातीमध्ये या विकासकामांतून गावाचा अधिक विकास साधता येणार आहे. त्यामुळे सरपंच आनंद ढवळे आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी कौतुक केले. त्याचप्रमाणे शहरांसोबत गावांनाही सुविधा मिळाल्या पाहिजेत यासाठी कटिबद्ध असल्याचे त्यांनी नमूद केले.

शिवकर ग्रामपंचायत अंतर्गत घनकचरा प्रकल्प तयार करणे (१८ लाख रुपये), शिवकर येथे अंतर्गत भूमिगत गटार तयार करणे (आठ लाख रुपये), वसंत ढवळे चाळ ते दीक्षा बिल्डिंगपर्यंत रस्ता काँक्रीटीकरण व गटार बांधकाम करणे (१० लाख रुपये), सखाराम ढवळे यांचे घर ते प्रदीप कांबळे याच्या घरापर्यंत रस्ते व गटारे पेव्हर ब्लॉक व भूमिगत विद्युत वाहिनी टाकणे (एक कोटी ३० लाख रुपये), बुद्ध विहारचे सुशोभीकरण करणे (आठ लाख रुपये), पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून केंद्र सरकार पुरस्कृत जलजीवन मिशन अंतर्गत हर घर जल हर घर नल अभियान अंतर्गत शिवकर गावात नवीन पाण्याची टाकी बांधणे (३० लाख रुपये), मुस्लिम कब्रस्थानाला संरक्षण भिंत बांधणे व सुशोभीकरण करणे (३५ लाख रुपये), बौद्ध स्मशानभूमीला संरक्षण भिंत बांधून सुशोभीकरण करणे (२० लाख रुपये), नवीन स्मशानभूमी बांधणे (२० लाख रुपये) आणि व्यायामशाळेजवळ शौचालय बांधणे (तीन लाख ६७ हजार रुपये) अशा १० विकासकामांसाठी एकूण दोन कोटी ८२ लाख ६७ हजार रुपये खर्च करण्यात येणार आहेत. (पान २ वर..)

### सैफ अली खान हल्ला प्रकरण

## मुख्य आरोपीला अटक; पाच दिवसांची पोलीस कोठडी

**मुंबई : प्रतिनिधी**

बॉलीवूड अभिनेता सैफ अली खान याच्यावरील हल्ल्याप्रकरणी मुख्य आरोपी मोहम्मद शरीफुल इस्लाम शेहजाद (वय ३०) याला पोलिसांनी रविवारी (दि. १९) पहाटे ठाण्यातून अटक करण्यात आली. त्याला मुंबईतील वांद्रे न्यायालयात हजर केले असता पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.



आरोपी मोहम्मद शहजाद हिरानंदानी इस्टेट येथील झाडीत लपून पसला होता. त्याला पोलिसांनी रविवारी पहाटे ३च्या सुमारास ताब्यात घेतले. दरम्यान, आरोपी हा बांगलादेशी घुसखोर असल्याचे निष्पन्न झाले आहे. तो मुंबईत हाऊस किपींग एजन्सीमध्ये कामाला होता व हिंदू नाव घेऊन वावरत होता.

आरोपी बांगालादेशमधून बेकायदेशीरपणे भारतात आल्याचा संशय आहे. त्याच्याकडे भारतातील कोणतेही वैध कागदपत्र नसल्याची माहिती समोर येत आहे. त्यामुळे त्याच्याविरोधात पारपत्र कायदा व परकीय नागरिक कायद्यांतर्गत कलमांची वाढ करण्यात आली आहे. या संपूर्ण प्रकरणाचा अहवाल सादर करण्याच्या सूचना वांद्रे न्यायालयाने दिल्या आहेत. आरोपी पूर्वी ठाण्यातील हॉटेलमध्ये कामाला होता असेही समजते. या प्रकरणी पोलीस अधिक तपास करीत आहेत.

## पोलीस भरतीचे स्वप्न भंगले!

**बीड : प्रतिनिधी**

पोलीस भरतीची तयारी करणाऱ्या पाच तरुणांना एसटी महामंडळाच्या बसने चिरडल्याची धक्कादायक घटना रविवारी (दि. १९) पहाटे बीड-परळी रस्त्यावर घोडका राजुरी फाट्याजवळ घडली. या भीषण अपघातात तीन जणांचा जागीच मृत्यू, तर दोघे जखमी झाले आहेत.

### एसटी बसच्या धडकेत तिघांचा मृत्यू, दोघे गंभीर

पोलीस भरतीची तयारी करणारे पाच तरुण नेहमीप्रमाणे रविवारी पहाटे बीड-परळी रस्त्यावर व्यायामासाठी गेले होते. यादरम्यान एका भरधाव एसटी बसने त्यांना चिरडले. या दुर्दैवी घटनेत बालाजी मोरे, ओम घोडके आणि विराज घोडके यांचा जागीच मृत्यू झाला, तर इतर दोघे गंभीर जखमी झाले. जखमींवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.



# मराठी बंधू-भगिनींचे प्रेम अनमोल, मला या प्रेमातच राहायचेय -मुख्यमंत्री

**दावोस: वृत्तसंस्था**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे झ्युरिक, स्वित्झर्लंड येथे बृहन महाराष्ट्र मंडळ, स्वित्झर्लंडतर्फे उत्साहात स्वागत करण्यात आले. या स्वागत समारंभात मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी वैश्विक मराठी परिवारातील आपल्या मराठी बंधु-भगिनींशी मनमोकळा संवाद साधला.



बृहन महाराष्ट्र मंडळ, स्वित्झर्लंडच्या प्रेमाचे मोल नाही, मला या प्रेमातच राहायचे आहे, अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. मुख्यमंत्री फडणवीस पुढे म्हणाले की, आपला महाराष्ट्र भारताचे पॉवर हाऊस असून देश ५ ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था झाल्यानंतर एक ते दोन वर्षांतच महाराष्ट्र पहिली उपराष्ट्रीय ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था होईल. एआय तंत्रज्ञानात आघाडी घेतलेला महाराष्ट्र भारताचे डेटा सेंटर कॅपिटल असल्याचे म्हणत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्रात इनोव्हेशन सिटी तयार करणार असल्याचे सांगितले.

## दावोसमध्ये मराठीजनांशी साधला मनमोकळा संवाद

छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्याला देव, देश, धर्माकरता लढायला शिकवले, आपल्या संस्कृतीचा, भाषेचा अभिमान बाळगायला शिकवले, ती शिकवण मराठी माणसाने स्वित्झर्लंडमध्येही जपली आणि पुढच्या पिढीलाही दिली, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांनी मराठीला अभिजात भाषेचा दर्जा दिला असून मराठीला ज्ञानभाषा म्हणून प्रस्थापित करण्याचा आमचा प्रयत्न आहे. यासाठी स्वित्झर्लंडसह वैश्विक मराठी परिवारातील मराठी बंधु-भगिनी आमचे राजदूत असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

या प्रसंगी बृहन महाराष्ट्र मंडळ, स्वित्झर्लंडचे अध्यक्ष अमोल सावरकर, सेक्रेटरी किर्तीताई गद्रे, महेश बिरादार व इतर मान्यवर उपस्थित होते.

## महाकुंभमेळ्यात भीषण आग, अनेक तंबू जळून खाक

**प्रयागराज : वृत्तसंस्था**



उत्तर प्रदेशातील प्रयागराजमधील महाकुंभमेळ्यात रविवारी (दि. १९) अनेक तंबूंना आग लागली. या दुर्घटनेत सुमारे २५ तंबू जळून खाक झाल्याचे प्राथमिक वृत्त आहे. दरम्यान, आग आटोक्यात आली असून सर्व लोक सुरक्षित आहेत. कोणीही जखमी झालेले नाही. या प्रकरणाची चौकशी केली जाईल, अशी माहिती अतिरिक्त पोलीस महानिरीक्षण भानू भास्कर यांनी 'पीटीआय'शी बोलताना दिली.

महाकुंभमेळ्यासाठी सेक्टर १९मध्ये उभारण्यात आलेल्या एका कापडी तंबूत सिलिंडरचा स्फोट झाला. यामुळे अखिल भारतीय धर्म संघ श्रीकरपात्री धाम वाराणसीच्या कॅम्पमध्ये आग लागली. काही क्षणात आगीने अनेक तंबूंना आपल्या कवेत घेतले, अशी माहिती उत्तर प्रदेशचे मुख्य अग्निशमन अधिकारी प्रमोद शर्मा यांनी दिली.

आग आटोक्यात आणण्यासाठी १५-१६ अग्निशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या. खूप प्रयत्नांनंतर आग आटोक्यात आणण्यात आली आहे. सुदैवाने अद्याप कोणत्याही जीवितहानीबद्दल वृत्त नाही. दरम्यान, मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ घटनास्थळाची पाहणी करत अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या आहेत.

## रायगड जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांची आविष्कार भरारी, नागपूर येथे दौरा

**चौक : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषदेच्या विद्यार्थ्यांची अविष्कार भरारी घेऊन राष्ट्रीय अविष्कार अभियानातून नागपूर येथे भेट दिली, या विद्यार्थ्यांचे कौतुक होत आहे.

रायगड जिल्हा परिषद आयोजित,केंद्रीय प्रकल्पांतर्गत समग्र शिक्षा २०२४/२५ राष्ट्रीय आविष्कार अभियानाच्या राज्यांतर्गत शैक्षणिक अभ्यास सहलीचे आयोजन नागपूर येथील रामण विज्ञान केंद्र व तारामंडळ,नागपूर येथे करण्यात आले होते.या सहलीसाठी रायगड जिल्हा परिषदेच्या ६ शाळांची निवड करण्यात आली होती.

मुख्यमंत्री माझी शाळा,सुंदर शाळा उपक्रमात जिल्ह्यात प्रथम व विभागात द्वितीय पुरस्कार प्राप्त रायगड जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा,वडगाव ता.खालापूर, जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तळोदे पाचनंद पनवेल, रायगड जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा,मेढेखार अलिबाग,रायगड जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, शेणवई रोहा,रायगड जिल्हा परिषद शाळा, चरई पोलादपूर व रायगड जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, नवघर सुधागड या शाळेतील एकूण ४३ विद्यार्थी व शाम लवंगारे शाळा,चरई,योगिनी वैदू शाळा तळोदे पाचनंद,सौ. शिल्पा सुर्वे शाळा,शेणवई रोहा,मनीषा अंजर्लेकर शाळा मेढेखार अलिबाग,अनुजा माने शाळा नवघर पाळावी सुधागड या शिक्षकांची निवड करण्यात आली होती. सुभाष राठोड,शाळा वडगाव यांची या सहलीसाठी जिल्हा नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली होती.

या सहलीमुळे विद्यार्थ्यांना रामण विज्ञान केंद्र व राष्ट्रीय विज्ञान प्रदर्शन पाहण्याची संधी मिळाली.तारामंडळाची रचना,निर्मिती यावर ३ऊ शो दाखवण्यात आला.नागपूर येथील दिक्षा भूमी,ताजबाग,महाराज बाग प्राणिसंग्रहालय सफर अशी विविध प्रेक्षणीय व पर्यटनाचा आनंद मुलांनी लुटला.या कार्यक्रमाच्या प्रमुख पुनीता गुरव शिक्षणाधिकारी प्राथमिक,रायगड जिल्हा परिषद यांनी सहली दरम्यान संपर्कात राहून सहल यशस्वीपणे पार पाडण्यासाठी मार्गदर्शन केले. तसेच उपशिक्षणाधिकारी सुनील भोपळे, संतोष शेडगे यांनी सुद्धा विद्यार्थी व शिक्षकांना मार्गदर्शन केले.

## आदिती तटकरे पालकमंत्री होताच मुरुडमध्ये आतषबाजी

**मुरुड : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री म्हणून अदिती तटकरे यांची घोषणा होताच मुरुड तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी तर्फे फटाक्याची आतिषबाजी करुन आनंद व्यक्त करण्यात आला आहे.

रायगड जिल्ह्याचा पालकमंत्री कोण होणार याबाबत खूपच उत्सुकता होती. परंतु अखेर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अदिती तटकरे यांचे नाव घोषित करताच मुरुड तालुका राष्ट्रवादी काँग्रेस तर्फे आनंद व्यक्त करण्यात आला.फटाक्याची आतिषबाजी करत पेढे वाटून आनंद व्यक्त करण्यात आला.

या वेळी मुरुड तालुका राष्ट्रवादी पक्षाचे प्रमुख नेते मनोज भगत,हसमुख जैन, मृणाल खोत अजित आदी उपस्थित होते.



## कोपरखैरणे विभागातील मुख्य रस्त्यांवर सखोल स्वच्छता मोहीम

**नवी मुंबई : बातमीदार**

सखोल स्वच्छतेव्दारे हवा गुणवत्ता सुधारणेवर भर देत ३० डिसेंबर पासून १३ जानेवारी पर्यंत आठही विभाग कार्यालय क्षेत्रात महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सार्वजनिक सुट्टयांसह सलग १५ दिवस सखोल स्वच्छता मोहीमा प्रभावीपणे राबविण्यात आल्या. त्यामुळे हवा गुणवत्तेत सुधारणा झाल्याच्या प्रतिक्रिया नागरिकांकडून व्यक्त करण्यात येत आहेत.



अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांच्या नियंत्रणाखाली राबविल्या जात असलेल्या या स्वच्छता मोहीमांमध्ये प्राधान्याने रस्ते, पदपथ, दुभाजक यांच्या कडेला जमा झालेली माती गोळा करुन त्याठिकाणी प्रक्रियाकृत पाण्याने स्वच्छता करण्यावर भर देण्यात आला. त्याचप्रमाणे से.११ कोपरखैरणे येथील मुख्य रस्त्यावरील दुभाजक पाण्याने साफ करुन रंगावरील धूळ धुवून घेण्यात आली.

## कर्जतमध्ये भविष्यात दोनशे खाटांच्या रुग्णालयाच्या उद्घाटनाला मी येईन -मंत्री प्रकाश आबिटकर

**कर्जत : प्रतिनिधी**

शासकीय रुग्णालयांचा बरा - वाईट अनुभव घेतलेला मी कार्यकर्ता आहे. कधी रुग्णवाहिका मिळत नाही, कधी डॉक्टर उपलब्ध नाही. अशा अनेक समस्या अनुभवलेला आहे. त्यामुळे सर्व सामान्यांच्या गरजा मला माहिती आहेत. आरोग्य खात्याच्या अनेक योजना आहेत. त्यांचा लाभ घेणे आवश्यक आहे. कर्जतमध्ये दोनशे खटांचे रुग्णालय असावे अशी मागणी आमदार महेंद्र थोरवे यांनी केली आहे. त्यामुळे कर्जत मध्ये आता दोनशे खाटांच्या रुग्णालयाच्या उद्घाटनालाच मी येईन.' असा शब्द राज्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी येथे दिला.

खालापूर विधानसभा मतदार संघातील महायुतीतील घटक पक्ष शिवसेना शिंदे गट, भाजप व आर पी आय महायुतीतील पक्षांच्या वतीने रायगड जिह्यातील नवनिर्वाचित खासदार धैर्यशिल पाटील, रोजगार हमी कॅबिनेट मंत्री भरत गोगावले, आमदार रवींद्र पाटील, आमदार महेंद्र दळवी व आमदार विक्रांत पाटील यांच्या सत्कार सोहळ्याचे आयोजन कर्जत येथील सीबीसी लॉन ( रॉयल गार्डन ) येथे संपन्न झाला.

याप्रसंगी जिल्हाप्रमुख संतोष भोईर, भाजपा जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, आरपीआयचे जिल्हाध्यक्ष नरेंद्र गायकवाड, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष सुरेश टोकरे, जिल्हा परिषद माजी सभापती नरेश पाटील, माजी नगराध्यक्ष शरद लाड, उप जिल्हाप्रमुख भाई गायकर, संपर्क प्रमुख विजय पाटील, जिल्हा महिलाध्यक्षा अश्विनी पाटील, पंकज पाटील, शिवराम बदे, संभाजी जगताप, तालुका प्रमुख सुदाम पवाळी, दीपक बेहेरे, मनोहर थोरवे, रमेश मुंढे, मंगेश म्हसकर, भाजपा तालुकाध्यक्ष राजेश भगत, राहुल डाळिंबकर, अंकुश दाभणे आदी उपस्थित होते.



आमदार महेंद्र थोरवे यांनी उपस्थितांचे स्वागत व सत्कार करून प्रास्ताविकात 'खऱ्या अर्थाने प्रामाणिकपणे या निवडणुकीमध्ये महायुतीचं काम करणाऱ्या सर्वसामान्य कार्यकर्त्यांमुळे या मतदारसंघाचा आमदार म्हणून उभा आहे. माझ्या सगळ्याच पदाधिकाऱ्यांनी महायुतीच्या आणि कार्यकर्त्यांनी अतिशय प्रामाणिकपणे या संघर्षात माझी साथ दिली. तुम्ही दिलेला आशीर्वादामुळेच या मतदारसंघाला नव्याने उभारी देण्याचे काम मी मागील पाच वर्षांपासून करीत आहे. कर्जतमध्ये दोनशे खटांचे रुग्णालय व्हावे. अशी मागणी मी करीत आहे. आता याच मतदारसंघा दुसरे पर्व सुरू झाले आहे. अशीच साथ मला द्या.' अशी अपेक्षा व्यक्त केली.

आमदार विक्रांत पाटील यांनीही मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी नवनिर्वाचित खासदार व आमदारांचा सन्मान करण्यात आला. तसेच रिलायन्स फाउंडेशन स्कूलमध्ये इतिहास शिक्षक म्हणून कार्यरत असलेल्या संजय शांताराम वझरेकर यांनी आतापर्यंत आठ पुस्तकांची निर्मिती केली आहे. त्यांच्या ' विश्वव्यापी छ्त्रपती शिवाजी महाराज 'या पुस्तकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

खासदार धैर्यशील पाटील यांनी ' माझ्या वडिलांचे या मतदासंघाशी घनिष्ट संबंध होते. तुमच्या या आदरातिथ्याने त्याची मला आठवण होत आहे. ' असे स्पष्ट केले. खासदार श्रीरंग बारणे यांनी, 'महेंद्र थोरवे यांच्या कार्याचे कौतुक करत 'संघर्षातून माणूस मोठा होतो, आणि प्रत्येक संघर्ष माणसाला नवीन गोष्टी शिकवतो. तुम्ही कर्जत-खालापूर तालुक्यासाठी दिलेले योगदान खूप मोठे आहे. तुम्ही प्रामाणिकपणे विकासासाठी केलेल्या प्रयत्नांमुळे मतदारसंघाचा चेहरा बदलत आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली आपण सर्वांनी विकासाची दिशा निश्चित केली आहे.' भरत गोगावले यांनी ' मी निष्ठावंत आहे. मी पदासाठी राजकारण केले नाही. माझे काम जनतेसाठी असून शिवसेनेच्या विचार धारेशी प्रामाणिक राहणे. हेच माझे ध्येय आहे. येणाऱ्या काळात कर्जत खालापूर मतदार संघाच्या विकासासाठी मी सर्वतोपरी सहकार्य करीन.' असे आश्वासन दिले. अभिषेक सुर्वे आणि समीर सोमणे यांनी सूत्रसंचालन केले. याप्रसंगी प्रसाद थोरवे, डॉ. राजू थोरवे, सुरेखा शितोळे, मीना थोरवे, मनीषा भासे, विलास पाटील आदींसह युतीचे असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

पान १ वरुन

### उरण चिरनेर येथे बर्ड फ्लू

बर्ड फ्लू हा आजार मानवात संक्रमित होऊ शकणारा असल्याने प्रतिबंधात्मक उपाययोजनेसाठी प्राण्यांमधील संक्रामक व सांसर्गिक रोग प्रतिबंधक अधिनियम २००९ व बर्ड फ्लू रोगप्रसार रोखण्यासाठीचा भारत सरकारचा सुधारित कृती आराखडा २०२१मधील तरतुदीनुसार रायगड जिल्हाधिकारी यांनी चिरनेर तालुका येथील बाधित क्षेत्रापासून एक किमीपर्यंतचा परिसर बाधित क्षेत्र व एक ते दहा किमीपर्यंतचा परिसर सर्वेक्षण क्षेत्र म्हणून घोषित केला आहे.

बाधित क्षेत्रातील निरोगी दिसणारे पाळीव पक्षी, पक्ष्यांचे मांस, अंडी, विस्टा, तूस, भुसा इत्यादी शास्त्रोक्त पद्धतीने नष्ट करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. बाधित क्षेत्रातून मृत व जिवंत पक्षी, खाद्य, मांस, विस्टा, उपकरणे इत्यादींची वाहतूक करण्यास ९ फेब्रुवारीपर्यंत मनाई करण्यात आली आहे.

### पनवेलच्या शिवकरमध्ये विकासाचे महापर्व

या वेळी सरपंच आनंद ढवळे यांनी आमदार प्रशांत ठाकूर यांनी नेहमीच शिवकर ग्रामपंचायतीच्या विकासासाठी निधी देत या गावाचा विकास साधला असल्याचे नमूद केले आणि आमदार प्रशांत ठाकूर व तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांचे आभार व्यक्त करत त्यांना धन्यवाद दिले.

दरम्यान आमदार प्रशांत ठाकूर, तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्यासह उपस्थित मान्यवरांनी बुद्ध विहारात तथागत गौतम बुद्ध आणि भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पमाला अर्पण करून अभिवादन केले.

## रुग्णांची सेवा हीच खरी ईश्वरसेवा -डॉ. पराग संचेती

**महाड : प्रतिनिधी**

देशातील अत्याधुनिक उपचारासाठी प्रसिद्ध असलेले पुण्यातील संचेती हॉस्पिटलचे यश सर्व सामान्य रुग्णांच्या सेवेतुन मिळाले. वैद्यकिय क्षेत्रामध्ये काम करीत असताना सेवाभाव महत्वाचा असल्याचे स्पष्ट करुन रुग्णांची सेवा हीच खरी इश्वराची सेवा आहे असे मौलिक विचार प्रसिध्द अस्थिरोग तज्ञ डॉ.पराग संचेती यांनी महाडमध्ये आयोजित करण्यात आलेल्या शिबिरामध्ये केले. या वेळी शिबीराचे उद्घाटक नामदार भरत गोगावले यांनी शिबीराच्या संयोजकांचे कौतुक केले.

रोटरी क्लब ऑफ महाड, संचेती हॉस्पिटल पुणे आणि सुदर्शन केमिकल इंडस्ट्रीज यांच्या सहकार्यातुन रविवार(दि.१९ )रोजी महाड शहरांतील श्री वीरेश्वर महाराज मंदिराच्या सभागृहांमध्ये अस्थिरोग तपासणी शिबिर आयोजित करण्यांत आले होते. या शिबीराचे उद्घाटन नामदार भरतशेट गोगावले यांच्या हस्ते करण्यात आले




या वेळी सुषमा गोगावले, पुण्यातील प्रसिध्द संचेती हॉस्पिटलचे चेअरमन डॉ.पराग संचेती, अस्थिरोग तज्ञ डॉ.प्रमोद भिलारे, डॉ.दर्शन सोनावणे महाड मधील अस्थिरोग तज्ञ डॉ. श्रीकांत रानडे, महाड रोटरीचे अध्यक्ष अरुण गावडे, सुदर्शन केमिकलच्या श्रीमती सानप, उप विभागीय पोलिस अधिकारी शंकर काळे आदी मान्यवर उपस्थित होते.

डॉ. पराग संचेती यांनी आपल्या भाषणा मध्ये नामदार गोगावले यांच्या कार्याचे कौतुक करीत महाड मध्ये प्रथमच अस्थिरोग तपासणी शिबीराचे आयोजत करण्यांत आले असुन या शिबीराला महाडकर नागरिकांकडून अतिशय चांगला प्रतिसाद मिळाला बद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. आजच्या धावपळीच्या जीवनांमध्ये हाडांच्या आजारांमध्ये वाढ होत असल्याचे दिसुन येते, वय वाढत असताना समस्या वाढू नयेत या करीता प्रामुख्याने जेष्ठ नागरिकांनी स्वत:ची काळजी स्वत: घेण्याची आवश्यकता असल्याचे डॉ संचेती म्हणाले.

महाडमध्ये रुग्णांची तपासणी केली जात असताना प्रामुख्याने कंबर,पाठ दुखी,गुढगे दु:खीचे रुग्ण अधिक आढळून आले. असे आजार बरे होण्या करीता नियमित व्यायाम व योग्य आहार सेवन करणे आवश्यक आहे. त्याच बरोबर बाहेरील पदार्था पासुन दुर राहावे असा सल्ला त्यांनी दिला. शिबीरा मध्ये तपासणी करण्यांत आलेल्या रुग्णांवर पुढील उपचार करण्यासाठी पुण्यांतील संचेती हॉस्पिटल मध्ये सोय केली आहे.

आर्थिक दृष्ट्या दुर्बल असलेल्या रुग्णांवर मोफत उपचार करण्यांत येतील. त्याच बरोबर जलद वेदना मुक्तता, स्मार्ट नॅव्हिगेशन तंत्रज्ञान,अचुक निदान या वैशिष्ट्याप्रमाणे आधुनिक तंत्रज्ञानांतुन रुग्णांवर उपचार करण्यांत येत असल्याची माहिती डॉ संचेती यांनी दिली.

नामदार गोगावले यांनी शिबीराच्या संयोजकांचे कौतुक केले. अस्थिरोग निदान शिबिर भरविणे ही काळाची गरज ओळखून रोटरी क्लबने अतिशय चांगले काम केले असल्याचे सांगुन महाड तालुक्यांतील गोरगरीब जतने करीता रोटरी क्लबने अस्थिरोग तपासणी आयोजित केल्या बद्दल धन्यवाद दिले.

त्यांनी बाहेरील पदार्थाचा वापर खाण्यांमध्ये अधिक होत असल्याने त्याचा परिणाम शरिरांतील हाडांवर होत असल्याचे डॉक्टरांचे म्हणणे असुन ज्यांची हाडे मजबूत तो अधिक मजबुत असे मत व्यक्त केले. पुण्यांतील संचेती यांच्या हॉस्पिटल मध्ये रुग्णांवर योग्य उपचार केले जात असल्याचा विश्वास व्यक्त करताना त्यांनी डॉ पराग संचेती यांचे वडीलांचे देखील वैद्यकीय क्षेत्रात फार मोठे योगदान असल्याचे सांगितले.

# ज्येष्ठांच्या आशीर्वादामुळे राजकीय आणि सामाजिक कार्य -आमदार प्रशांत ठाकूर



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शहरातील ज्येष्ठ नागरीक संघाचा २३ वा वर्धापन दिन सोहळा आज (दि. १९) मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या सोहळ्यामध्ये आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार विक्रांत पाटील यांचा जाहिर सत्कार ज्येष्ठ नागरीक संघाच्या वतीने करण्यात आला.

या सोहळ्याला सिने अभिनेत्री सीमा जाधव, उद्योजक जे.एम. म्हात्रे, ज्येष्ठ नागरीक संघाचे अध्यक्ष जयंत गुर्जर, सहसचिव भास्कर चव्हाण, माधुरी गोसावी यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी ज्येष्ठ नागरिकांसोबत संवाद साधून त्यांना शुभेच्छा दिल्या. तसेच ज्यांच्या लग्नाला ५० वर्ष पुर्ण झाली अश्या जोडप्यांना आणि ७५ वर्ष म्हणजेच अमृत महोत्सवी वर्ष पुर्ण केलेल्या ज्येष्ठ नागरीकांचा आमदार प्रशांत ठाकूर यांच्याहस्ते सत्कार करण्यात आला.

यावेळी मनोगत व्यक्त करताना आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांगितले की, आपल्या सर्वांच्या पाठबळामुळे आणि तुम्ही दिलेल्या आर्शिवादामुळेच मला राजकीय आणि सामाजिक कार्य करता आले आणि हे आर्शिवाद मला या शहराला विकासाच्या दिशेने नेण्यासाठी आणि समस्यांपासून मुक्त करण्यासाठी प्रेरणा देत राहतील असे प्रतिपादन केले.

## शेअर मार्केटमध्ये नफा दाखवून फसवणूक करणारा आरोपी जेरबंद

**पनवेल : वार्ताहर**

शेअर मार्केट ट्रेडींगमध्ये गुंतवणूक केल्यास चांगला नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवून खारघर येथील बांधकाम व्यावसायिकाला तब्बल १४.८९ कोटी रुपयांचा ऑनलाईन गंडा घालणाऱ्या टोळीतील एका आरोपीला नवी मुंबई पोलिसांच्या सायबर पोलिसांनी बिहार राज्यातून अटक केली आहे.

सुजितकुमार मदनकुमार सिंग (३०) असे या आरोपीचे नाव असून त्याने कंबोडिया देशात जाऊन तेथील चाईनीज लोकांच्या संपर्कात राहून अनेक लोकांची सायबर फसवणूक केल्याचे उघडकीस आले आहे. सायबर पोलिसांनी आता या प्रकरणात सहभागी असलेल्या इतर आरोपींचा शोध सुरु केला आहे.

या प्रकरणात अटक करण्यात आलेला आरोपी सुजितकुमार सिंग याने आणि या प्रकरणात सहभागी असलेल्या इतर आरोपींनी २०२४ मध्ये संगनमत करुन खारघर भागात राहणाऱ्या बांधकाम व्यावसायिकाला शेअर्स खरेदी विक्री ट्रेडिंगमध्ये जास्तीचा फायदा असल्याचे भासवले होते. तसेच त्यात जास्तीचा नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवून बांधकाम व्यवसायीकाकडून ऑनलाईन पध्दतीने तब्बल १४ कोटी ८९ लाख रुपये उकळले होते.

याबाबत नवी मुंबई सायबर पोलीस ठाण्यात अज्ञात सायबर टोळी विरोधात गुन्हा दाखल झाल्यानंतर सायबर पोलिसांनी या गुह्यात वापरण्यात आलेल्या मोबाईल क्रमांकाचे तांत्रिक विश्लेषण केले. या तपासात आरोपी सुजितकुमार हा बिहार येथे असल्याची माहिती सायबर पोलिसांना मिळाली. सदर माहितीच्या आधारे पोलिसांच्या पथकाने बिहार राज्यात जावून सुजितकुमार सिंग याला ताब्यात घेतले.

त्यानंतर सायबर पोलिसांनी त्याची चौकशी केली असता, तो दोन वेळा कंबोडिया देशात गेल्याचे आणि त्याचा या गुह्यात सहभाग असल्याचे निष्पन्न झाल्यानंतर सायबर पोलिसांनी त्याला अटक केली. न्यायालयाने या आरोपीची ५ दिवस पोलीस कोठडीत रवानगी केली आहे.

## परिवार निरोगी, तर देश स्वास्थ्यपूर्ण- आमदार प्रशांत ठाकूर



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आपला परिवार स्वस्थ राहिला, तर आपला देश स्वास्थपूर्ण राहू शकतो, असे प्रतिपादन आमदार प्रशांत ठाकूर यांनी नवीन पनवेल येथे केले तसेच हौसिंग सोसायटी म्हणून सर्वांनी एकत्रित येऊन सामाजिक उपक्रमांचे आयोजन केल्याबद्दल कौतुक केले.

हेल्थ केअर इन्शुरन्स आणि जीसी अस्पिरा २०६ को ऑपरेटींग हौसिंग सोसायटीच्या माध्यामतून आणि अपोलो हॉस्पिटलच्या सहाकार्याने मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन रविवारी केले होते. हे शिबिर जीसी अस्पिरा सोसायटीमध्ये झाले. या शिबीरात परिसरातील नागरीकांनी आरोग्य तपासणी करुन लाभ घेतला. या शिबिराला आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देत शिबिराचे आयोजन केल्याबद्दल पदाधिकाऱ्यांचे आणि रहिवाशांचे कौतुक केले. या वेळी माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, युवा नेते किशोर चौतमोल उपस्थित होते.

## लोकनेते दि.बा. पाटील विद्यालयाच्या प्रकल्पाची राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनासाठी निवड

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शाश्वत भविष्यासाठी विज्ञान आणि तंत्रज्ञान या मुख्य विषयावर आधारित ५२वे रायगड जिल्हा विज्ञान प्रदर्शन सू.ए.सो.चे के. आ. बांठिया नवीन पनवेल या विद्यालयांमध्ये संपन्न झाले. या विज्ञान प्रदर्शनामध्ये विद्यार्थी व शिक्षक यांच्या १४० प्रकल्प प्रतिकृती सहभागी झाल्या होत्या.

इयत्ता सहावी ते आठवी या विद्यार्थी प्रकल्प गटामध्ये रयत शिक्षण संस्थेचे कामोठे येथील लोकनेते दि.बा. पाटील विद्यालयातील पृथ्वी विशाल सावंत व श्रेयश रामा घेरडे यांच्या कॉलिंग हेल्मेट या प्रकल्पाला तृतीय क्रमांक मिळाला असून अमरावती येथे होणाऱ्या राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनासाठी प्रकल्पाची निवड झाली आहे.

या प्रकल्पातून विद्यार्थ्यांनी टू व्हीलर चालवताना मोबाईलचा वापर होत असताना होणारे अपघात कसे कमी करता येतील यावर प्रकल्प सादर केला. या प्रकल्पासाठी विद्यालयातील शिक्षक अनिल पाटील यांनी त्यांना मार्गदर्शन केले.

विद्यालयाचे स्थानिक स्कूल कमिटीचे चेअरमन जयदास गोवारी, व्हाईस चेअरमन विनायक म्हात्रे, माजी चेअरमन व शिक्षणप्रेमी स्वामी आप्पा म्हात्रे, माजी चेअरमन बाळाराम चिपळेकर, सर्व सदस्य व विद्यालयाचे प्रभारी मुख्याध्यापक एम.डी. गावंड यांनी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे कौतुक केले व वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



## श्री संत वामनभाऊ आणि भगवान बाबा सेवा मंडळाचा अखंड हरिनाम सप्ताह

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री संत वामनभाऊआणि भगवान बाबा पुण्यतीथी सोहळयानिमीत्त अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन खांदा कॉलनीमध्ये करण्यात आले होते. या सप्ताह अंतर्गत १२ ते १८ जानेवारीदरम्यान विविध धार्मिक कार्यक्राम झाले तसेच रविवारी काल्याचे कीर्तन झाले. या कीर्तनाला पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देऊन दर्शन घेतले.

या वेळी पनवेल महापालिकेच्या माजी उपमहापौर सीताताई पाटील, ज्येष्ठ नेते सदानंद पाटील, गोपीनाथ मुंडे, देविदास खेडकर, सुनील खाडे, हरिदास वनवे, संजय वायबसे, विनायक मुंडे , विष्णू वायबसे, वैजनाथ मुंडे, बळीराम साबळे, विशाल टोपकर, प्रशांत खडवे, नामदेव मुंडे यांच्यासह इतर मान्यवर, पदाधिकारी व भाविक मंडळी उपस्थित होती.





**पनवेल : जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीतील सीकेटी महाविद्यालयातील जान्हवी भास्कर हातमोडे या तृतीय वर्ष कला शाखेतील विद्यार्थिनीला भारत, थायलंड, नेपाळ, श्रीलंका आणि अमेरिकेत कार्य करणाऱ्या प्रसिद्ध मनुष्यबळ विकास लोकसेवा अकादमीतर्फे सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल राज्यस्तरीय आदर्श युवा महाराष्ट्र युथ आयडॉल पुरस्कार २०२५ जाहीर झाला आहे. याबद्दल संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी जान्हवीचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या वेळी भास्कर हातमोडे उपस्थित होते.**

# शांतीदुतासाठी देवदूत ठरले कळंबोली अग्निशमन दल

## ◆ पतंगाच्या मांजाने आली होती कबुतराच्या जीवावर संक्रांत

**कळंबोली : बातमीदार**

मकर संक्रांतीनिमित्त उडवण्यात आलेल्या पतंगाच्या मांजात अडकून जीवानिशी जाणाऱ्या शांतिदूताला वाचवणारे महापालिकेचे कळंबोली अग्निशामक दल त्याच्यासाठी देवदुत ठरले आहे.

रविवारी सकाळी पतंगाच्या मांजात अडकलेले कबुतर पाहून एका पक्षी प्रेमीच्या जीवाची घालमेल झाली. त्याने त्वरित कळंबोली अग्निशामक दलाला दूरध्वनी करून सांगितले .क्षणाचाही विलंब न करता कळंबोली अग्निशामक दल प्रमुख मनीष ब्राह्मणकर यांनी आपल्या अग्निशामक दलाला सांगून मांजात अडकुन लटकलेल्या कबुतराची सुखरूप सुटका करून त्याला जीवदान दिले. कळंबोली अग्निशामक दलाने केलेल्या कामगिरीचे उपस्थित नागरिकांनी टाळ्या वाजवून अभिनंदन करून धन्यवाद दिले.

रोडपाली बस डेपो समोर झाड व विद्युततार यामध्ये पतंगाच्या मांजात गुरफडलेल्या अन लटकलेल्या स्थितीत कबूतर आपला जीव वाचवण्यासाठी फडफड करत होते. कबुतराची घालमेल सतनाम सिंग या सजग नागरिकाने पाहिली . त्यांनी त्वरित क्षणाचाही विलंब न करता कळंबोली अग्निशामक प्रमुख मनीष ब्राह्मणकर यांना कळवले.मनीष ब्राह्मणकर यांनी त्वरित आपले अग्निशामक दल जवान, रेस्क्यू टीम , रेस्क्यू गाडी घटनास्थळी पाठवली. यामधील प्रमुख अग्निशमन विमोचक ओंकार पाटील यांनी यशस्वीरित्या विजेच्या तारेवर मांजामध्ये अडकलेल्या कबुतराला सुखरूपपणे रेक्सु करून खाली आणले.

यावेळी यंत्र चालक सुरज कडु, नारायण गर्जे, अग्निशामक जवान परेश दुधे, योगेश जाधव मनिष काकडे यांनी मोलाची कामगिरी बजावली. शांतिदूत म्हणून प्रसिद्ध असणाऱ्या कबुतराला पनवेल महापालिकेच्या कळंबोली येथील अग्निशामक दलाने जीवनदान दिल्याने रेस्क्यू चे थरारक नाट्य पाण्यासाठी उपस्थित असलेल्या सर्वच नागरिकांनी टाळ्यांचा गजर करून कळंबोली अग्निशामक दलाचे अभिनंदन करून धन्यवाद दिले.



## रामशेठ ठाकूर कॉलेजमध्ये पुस्तक अभिवाचन उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात मुंबई विद्यापीठांतर्गत ग्रंथालयातर्फे पुस्तक अभिवाचन या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना स्वतः वेगवेगळ्या कविता कथा पुस्तकातील काही कंटेन्स हे चांगल्या पद्धतीने सादर करता यावेत हा होता.

विद्यार्थ्यांनी वेगवेगळे विषयाचे मासिके, वेगवेगळ्या विषयांची पुस्तके, संदर्भ ग्रंथ यांचे वाचनाच्या माध्यमातून चांगल्या पद्धतीने सादरीकरण विद्यार्थीनी केले. या कार्यक्रमामुळे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी वेगवेगळी कविता नाटके एकांकिका तसेच वेगवेगळ्या पुस्तकातील कथा सादर करण्याची प्रेरणा मिळाली.

प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांनी या उपक्रमाचे आयोजन केल्याबद्दल ग्रंथालय समितीचे अभिनंदन केले व पुढील उपक्रमासाठी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे आयोजन प्रा. पूजा लांजेकर यांनी केले तसेच वैभव झगडे, ग्रंथालय समितीतील इतर सर्व सदस्य शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले.





**पनवेल : ठाणे जिल्ह्यामधील शहापूर तालुक्यातील नूतन माध्यामिक विद्यालय चांग्याचापाडा या विद्यालयात शालेय इमारत आणि रंगमंच नूतनीकरण उद्घाटन करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाचे निममंत्रण रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य लोकनेते रामशेठ ठाकूर यांना चांग्याचापाडा हायस्कूलच्या स्कूल कमिटी ज्येष्ठ सदस्य रघुनाथ हरणे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दिनेश हरणे आणि मुख्याध्यापक मधुकर हरणे यांनी दिले**

## भारत टॅलेंट सर्च परीक्षेला सुरुवात

**मोहोपाडा** : केंद्र सरकारने ३४ वर्षानंतर शैक्षणिक धोरणात बदल केला असून या शैक्षणिक धोरणावर आधारित बीटीएस अर्थात भारत टॅलेंट सर्च परीक्षा घेतली जाते. या वर्षीची परीक्षा रायगड जिल्ह्यातील विविध केंद्रावर सुरळीत पार पडली. जिल्ह्यात एकूण ९०० विद्यार्थी या परीक्षेसाठी प्रविष्ट झाले होते. या परीक्षेसाठी विक्रम अडसूळ, ज्योती बेलवले, ज्ञानदेव नवसारे यांनी उत्तम नियोजन केले, तर परीक्षा केंद्रावर शरद नागटीळक, सतीश घावट, चौक केंद्र अमित मिडगुले, पनवेल केंद्र ज्योती भोपी, तर समन्वयक म्हणून रवी काजळे यांनी जबाबदारी पार पाडली.

# ग्रामीण भागात पोपटी पार्टीला सुरुवात

**हास्य जत्रेतील कलाकार पनवेलमध्ये पोपटीला**

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगडमधील लोक हे खाण्याच्या बाबतीत हौशी म्हणून ओळखले जात असून मुंबई बरोबरच रायगड मध्ये थंडीची चाहूल लागली असल्याने खवय्यांचे पाय आता ग्रामीण भागात फार्म हाऊस आणि शेताकडे वळू लागले असून वालाच्या शेंगा बाजारात विक्रीसाठी दाखल झाल्याने ग्रामीण भागात पोपटी पार्टीला सुरुवात झाली आहे.पोपटीची भुरळ ही सर्वसामान्यांन बरोबरच देश विदेशात हास्य सम्राट असलेल्या महाराष्ट्राची हास्य जत्रेतील कलाकारांना सुद्धा लागली असून पत्रकार प्रशांत शेडगे यांच्या हाताची पोपटीची चव चाखण्यासाठी हे रतिमहारती पनवेल येथील प्रीतम पाटील यांच्या फार्महाऊसवर अवतरले होते.



थंडीची चाहूल लागल्याने आता रायगड परिसरात गर्मीची जागा थंडाव्याने घेतली आहे.हिवाळ्यात शहरातील पारा काही प्रमाणात खाली आला असून लोकांनी ठेवणीतले स्वेटर,मफलर ,शाल तसेच कानटोपरे कपाटामधून बाहेर काढले आहेत. हिवाळा म्हंटले कि घाटमाथ्यावर तसेच विदर्भ पट्यात प्रत्येकाच्या शेतात हुरडा पार्टी जोरात चालतात. घाटमाथ्या वरील हुरडा पार्टी सारखी शेजारच्या कोकणात थंडीत शेतात मोगा पार्टी किंवा पोपटी करतात.

यासाठी खड्डयात माठ ठेवून त्याच्यात खाली तळाला प्रथम मीठ आणि ओवा घालतात. या पार्टीसाठी येणारी सगळी मंडळी एखादा पदार्थ घेऊन येतात. त्यात पावट्याच्या शेंगा, मक्याची कणसं, भुईमुगाच्या शेंगा, रताळी असं कायबाय असतं. माठात याचे थरावर थर दिले जातात. मग ओव्याच्या वासाच्या पाल्याने माठाचे तोंड बंद केले जाते. वरून झाकण घालतात आणि त्याच्या बाजूने चगळचोथा, गवऱ्या, लाकडाच्या ढलप्या लावून ते पेटविले जाते.

माठामध्ये भाज्यांचे थर कसे लावायचे, माठ शेकोटीत किती वेळ ठेवायचा या साऱ्याचे नियोजन जाणकार मंडळी करतात. फक्त चवीला मीठ व पचनाला ओवा एवढंच असूनही भाज्यांमुळं चवीमुळे ही मोगा पार्टी भलतीच बहारदार होते. देशावरची हुरडा पार्टी, कोकणातली मोगा आणि पोपटी पार्टी या प्रमाणेच खानदेशात भरीत पार्टी केली जाते.

महाराष्ट्रात हिवाळ्या मध्ये प्रत्येक जिल्ह्यात हुरडा पार्टीचे प्रकार वेगळे असले तरी हिवाळ्यात रायगड जिल्ह्यात पोपटी हा प्रकार मोठ्या प्रमाणात बघायला मिळतो.अश्या या पोपटीच्या हास्य जत्रेतील सर्व कलाकार प्रेमात पडले असून पुन्हा एकदा पोपटी खायला येणार असे सर्वानी जातांना आवर्जून सांगितले.

## संपादकीय

# पालकमंत्रिपदाचे वाटप

प्रजासत्ताक दिनाला आठ दिवस बाकी असताना राज्यातील जिल्ह्यांचे पालकमंत्री जाहीर करून राज्य सरकारने आणखी जोमाने काम करण्याचा निर्धार केला आहे. विशेष म्हणजे स्वतः मुख्यमंत्र्यांनी गडचिरोली या दुर्गम आणि नक्षलग्रस्त जिल्ह्याचे पालकमंत्रीपद स्वीकारून चांगला संदेश दिला आहे.

**राज्य मंत्रिमंडळाचे खातेवाटप झाल्यानंतर पालकमंत्री कधी जाहीर होणार अशी विचारणा होत होती. विशेषकरून विरोधकांकडे दुसरा काही मुद्दा नसल्याने त्यांची पालकमंत्रिपदावरून टीका-टिपण्णी सुरू होती, परंतु राज्याचा गाडा चालवताना अनेक निर्णय सांभाळून घ्यावे लागतात. राज्यातील जनतेने भाजप महायुतीला भरभरून यश दिल्याने अपेक्षा आणखी वाढल्या आहेत. त्यामुळेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस अधिक लोकाभिमुख व पारदर्शक पद्धतीने राज्य कारभार पाहत आहेत. त्यांनी आगामी शंभर दिवसांच्या कामांची आखणी करून सर्वसामान्य जनतेचे दैनंदिन जीवन कसे सुकर होईल या अनुषंगाने काम करण्याचे निर्देश दिले आहेत. सरकार स्थापन होऊन मंत्रीमंडळ विस्तार व खातेवाटप झाल्यानंतर पालकमंत्रिपदाचे वाटप बाकी राहिले होते. तेही अखेर पूर्ण झाले आहे. विशेष म्हणजे मुख्यमंत्री फडणवीस यांनी नलक्षग्रस्त व दुर्गम म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गडचिरोली जिल्ह्याचे पालकमंत्रीपद स्वत:कडे घेत नवा आदर्श घालून दिला आहे. तसे पाहिले तर अनेकांना पालकमंत्री म्हणून चांगला जिल्हा मिळावा अशी अपेक्षा असते. ये-जा करण्यास सोयीस्कर, सुरक्षित आणि काम करण्यासाठी विकसित असणारा जिल्हा मिळावा अशी अनेक मंत्र्यांची मनीषा असते. जरी कोण याबाबत स्पष्टपणे बोलत नसले तरी आतून प्रत्येकाला चांगला जिल्हा मिळावा असे वाटत असते. त्या दृष्टीने मुख्यमंत्री असलेले फडणवीस इतर कोणत्याही जिल्ह्याचे पालकमंत्रिपद भूषवू शकले असते, पण त्यांनी जाणूनबुजून गडचिरोली जिल्ह्याची निवड केली. यामागचे कारण म्हणजे तेथील नक्षलग्रस्त चळवळीला पायबंद घालून मागास जनतेला मुख्यमंत्र्यांना विकासाच्या मूळ प्रवाहात आणायचे आहे. काही दिवसांपूर्वीच त्यांनी गडचिरोलीत जाऊन विविध विकासकामांचा शुभारंभ केला. या वेळी त्यांच्या उपस्थितीत जहाल नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केले. तेव्हा मुख्यमंत्र्यांनी गडचिरोलीत विकासाची नवी पहाट उगवल्याचे म्हटले होते. तेवढे बोलून गप्प न बसता त्यांनी आता गडचिरोली जिल्ह्याचे पालकमंत्रीपद स्वीकारून जणू नवे आव्हान स्वीकारले आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे बीड आणि पुण्याचे पालकमंत्रीपद देण्यात आले आहे, तर मुंबई शहर आणि ठाण्याच्या पालकमंत्रिपदाची जबाबदारी दुसरे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंकडे देण्यात आली आहे. काही मंत्र्यांना सहपालकमंत्रीही करण्यात आले आहे, तर सध्या विरोधकांकडून आरोप होत असलेले मंत्री धनंजय मुंडे यांना कोणत्याही जिल्ह्याचे पालकमंत्रीपद देण्यात आलेले नाही. सरकारचा हा निर्णय रास्तच म्हटला पाहिजे. बीडमधील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्येप्रकरणी मुंडेंचे नाव घेतले जात आहे. जोपर्यंत हे प्रकरण मार्गी लागत नाही तोपर्यंत मुंडे यांना पालकमंत्रीपद न देऊन महायुती सरकारने तटस्थ भूमिका बजावली आहे. पालकमंत्रिपदाच्या यादीत काही नव्या मंत्र्यांची वर्णी लागली आहे, तर काही मंत्र्यांना स्थान मिळू शकलेले नाही. पालकमंत्री जाहीर झाल्यानंतर आता जिल्ह्याच्या मुख्यालयी प्रजासत्ताक दिनी ध्वजारोहण कोण करणार हा प्रश्न मिटला आहे. याबरोबरच विकासालाही आणखी वेग येणार आहे.**


# कर्जत तालुका बैलगाडा शर्यतींच्या हक्काचे ठिकाण



खबरबात
विजय मांडे

पूर्वीपासूनच छकड्यांच्या शर्यतींसाठी कर्जत तालुका प्रसिध्द होता. आता नवीन स्वरूपात बैलगाडा शर्यती सुरू झाल्या. शासनाकडून मध्यंतरी या शर्यतींना बंदी होती. तरीसुध्दा तालुक्यात कुठेना कुठे लपून छपून या शर्यती होत होत्या. त्यासाठी जिल्हाभरातून बैलगाडा मालक शर्यतींसाठी येत असत, मात्र बंदी उठवण्यात आली आणि अटी-शर्तीवर शर्यतींना मान्यता देण्यात आली. त्यानंतर पुन्हा शर्यती सुरू झाल्या आणि कर्जत तालुक्यात शर्यतींना थरार पुन्हा सुरू झाला. तसे पाहिले तर रायगड जिल्ह्यात सर्वात जास्त बैलगाडा शर्यती कर्जत तालुक्यात होत असतात. आता या बैलगाडा शर्यती आयोजित करण्यासाठी विविध राजकीय पक्षातील पदाधिकार्यांमध्ये स्पर्धा होताना दिसत आहेत.

पूर्वी छकड्यांच्या शर्यती गावागावात होत असत. छकडे हकलण्यासाठी ठराविक चालक असत, तर निर्णय देण्यासाठीही विशेष पंच उपस्थित असत. ४०-४५ वर्षांपूर्वी मंदिराच्या जीर्णोद्धाराला आर्थिक मदत व्हावी यासाठी छकड्यांच्या शर्यतींचे आयोजन करीत असत. कालांतराने या स्पर्धांना व्यावसायिक स्वरूप आले. त्या काळीसुद्धा कर्जत तालुक्यात प्रत्येक आठवड्याला शर्यती होत असत. या शर्यतींचे इतके वेड होते की, त्या नादात तहान भूक हरपून दिवस दिवस शर्यती पहाण्यासाठी खेड्यापाड्यातील लोक मोठ्या संख्येने येत असत. त्या वेळी वाहने कमी असल्याने पहाटे किंवा सकाळी लवकर शर्यतप्रेमी चालत स्पर्धेच्या ठिकाणी येत असत. त्या वेळी शर्यतींची इतकी इर्षा असे की, एका एका छकड्याच्या बरोबर अख्खा गाव येत असे. त्या वेळी भांडणेसुद्धा खूप होत असत. भांडण झाल्यावर बैलांना मारण्यात येणाऱ्या पराणीचा उपयोग माणसांसाठी करण्यात येत असे. एक दोन ठिकाणी या शर्यती जीवावरसुद्धा बेतल्या आहेत.



आता सारे बदलले आहे. प्राणीप्रेमींनी यामध्ये लक्ष घालून पूर्वी शर्यतीच्या वेळी पराणीचा उपयोग व्हायचा त्यावर बंदी आली. दरम्यानच्या काळात या शर्यती बंद करण्यात आल्या होत्या. एक दीड वर्षांपूर्वी काही अटींवर बैलगाडा शर्यतींना परवानगी देण्यात आली. त्यानंतर संपूर्ण महाराष्ट्रात शर्यती सुरू झाल्या. पूर्वी हंडा, बादलीवर शर्यती असायच्या आता लाखा लाखांच्या शर्यती होत असतात. ज्या ठिकाणी शर्यतीचे मैदान आहे त्या ठिकाणी जाणाऱ्या रस्त्यावर वाहनांची गर्दी असते. पूर्वी ९ -१० वाजता शर्यती सुरू होत असत. आता दुपारी एक-दीडनंतरच शर्यती सुरू होतात ते अगदी काळोख पडेपर्यंत. पूर्वी शेतीसाठी छकडे येत असत. आता एखाद्या टेम्पोमध्ये दोन तीन बैल, छकडा आणि त्या टेम्पोतच छकडा हाकलणारे व त्यांच्याबरोबर त्यांना हुरूप देणारी हौशी मंडळीही येत असतात. पूर्वी ढवळ्या-पवळ्या सर्जा-राजा, भुऱ्या, काळ्या, मोरा अशी पारंपारिक नावे होती. आता त्यात बदल होऊन बकासुर, माथूर अशी नावे येऊ लागली आहेत.

पूर्वी याच शर्यती छकड्यांच्या शर्यती असे नाव होते. आता बैलगाडा शर्यती असे नामकरण झाले आहे. पूर्वी छकडा मजबूत असायचा. आता तो एकदम हलका वापरण्यात येतो. हे बदल काळानुरूप झाल्याचे शर्यतीचे शौकिन सांगतात.

रायगड जिल्ह्यात सर्वात जास्त बैलगाडा शर्यती कर्जत तालुक्यात होत असतात. दिवसाआड या शर्यती होत असतात. कर्जतचे बैलगाडाप्रेमी घाटमाथ्यावरसुद्धा शर्यतींसाठी जात असतात व घाटमाथ्यावरील कर्जत तालुक्यात येत असतात. कर्जत तालुक्यातील सर्वच राजकीय पक्षातील लोक प्रतिनिधी व पदाधिकारी बैलगाडा शर्यतींचे आयोजन करतात. गेल्या सहा महिन्यात राजकीय पक्षाच्या पुढाऱ्यांनी बैलगाडा शर्यतींचे मोठ्या प्रमाणात आयोजन केले आहे. आयोजनात येणाऱ्या बैलगाडा शर्यतींमध्ये उतरणाऱ्या स्पर्धकांना तसेच उपस्थित असलेल्या हजारो रसिकांनासुद्धा भोजनाचा आस्वाद देण्यात कमी नाहीत. शर्यतीच्या रस्त्यावर मध्ये कुणी येऊन अपघात होऊ नये यासाठी संपूर्ण शर्यतीच्या रस्त्यावर स्टेडियम तयार करून शर्यतीचे आयोजन करण्यावर भर दिला जातो. एकंदरीत बैलगाडा शर्यतींचे माहेरघर कर्जत तालुका आहे हे मात्र खरे...!

## बदलते तंत्रज्ञान



# अल्गोरिदमच्या ट्रेनिंगसाठी 'एआय' कंपन्यांकडून खरेदी



यूट्यूबर आणि डिजिटल कंटेंट क्रिएटर मंडळी आता केवळ आपले व्हिडीओ प्रसिद्ध करूनच नव्हे, तर न वापरलेले व्हिडिओ विकूनही मोठी कमाई करीत आहे.

ओपनएआय, गुगल आणि मून व्हॅली यांसारख्या 'एआय' कंपन्या आपल्या अल्गोरिदमला ट्रेनिंग देण्यासाठी हे व्हिडीओ खरेदी करीत आहेत. हे व्हिडीओ अद्वितीय असतात तसेच 'एआय' यंत्रणांना अधिक उत्तम बनविण्यासाठी उपयुक्त असतात.

गुणवत्ता आणि फॉरमॅट चांगला असलेल्या व्हिडीओंना अधिक किंमत मिळत आहे. यूट्यूब, इन्स्टाग्राम आणि टिकटॉक यांसाठी चित्रित करण्यात आलेल्या साधारण व्हिडीओजसाठी प्रति मिनिट १५० रुपये दिले जात आहेत.

कंपन्या इंटरनेटवरील व्हिडीओ वापरून मॉडेल्सना प्रशिक्षित करीत होत्या. यामुळे कंटेंट क्रिएटर्स आणि अभिनेत्यांनी परवानगीशिवाय त्यांच्या सामग्रीचा वापर केल्याने नाराजी व्यक्त केली होती. हे टाळण्यासाठी कंपन्यांनी जुने फुटेज विकत घेणे सुरु केले आहे.

का वाढली व्हिडिओ फुटेजची गरज?


ओपनएआय, मेटा आणि डोब यांसारख्या कंपन्यांनी गेल्या वर्षी एआय व्हिडीओ जनरेटर लाँच केले होते. हे जनरेटर टेक्स्ट प्रॉम्प्टच्या आधारे कृत्रिम व्हिडीओ फुटेज तयार करतात. हे फुटेज खऱ्या व्हिडिओंसारखेच दिसते.

या यंत्रणांना ट्रेनिंग देण्यासाठी मोठ्या प्रमाणात डाटा आणि व्हिडीओ फुटेजची गरज असते. स्पर्धेत पुढे राहण्यासाठी कंपन्यांना जास्तीत जास्त डाटा हवा आहे.

३५० रुपये इतकी रक्कम मेटा एआयसारख्या कंपन्या केवळ १ मिनिटाच्या व्हिडिओ फुटेजसाठी देत आहेत. ४के गुणवत्ता, ड्रोन फुटेजसाठी जास्त पैसे देत आहेत.

दरम्यान, युट्यूबच्या वापरकर्त्यांसाठी कंपनी नेहमीच बदल करण्यात येत असतात. यामध्ये अॅड फ्री युट्यूब तसेच व्हीडिओमधून पैसे कसे मिळवायचे याचे फिचर काढण्यात आले आहेत.

# भारतीय उद्योगपती सर रतनजी टाटा



निमित्त

सर रतनजी जमशेदजी टाटा हे ब्रिटीश राजवटीत भारतीय फायनान्सर आणि फिलांथेरपिस्ट होते. रतनजी टाटा यांचा जन्म २० जानेवारी १८७१ रोजी ब्रिटिश भारतातील बॉम्बे येथे झाला. प्रख्यात पारशी व्यापारी जमशेदजी टाटा हे त्यांचे वडील होते.

रतन टाटा यांचे शिक्षण मुंबईतील सेंट झेवियर्स कॉलेजमध्ये झाले आणि त्यानंतर त्यांनी वडिलांच्या फर्ममध्ये प्रवेश केला. १९०४मध्ये थोरल्या टाटांच्या मृत्यूनंतर रतन टाटा आणि त्यांचे भाऊ दोराबजी टाटा यांना वारसाहक्काने खूप मोठी संपत्ती मिळाली. यापैकी बरीच संपत्ती त्यांनी व्यावहारिक स्वरूपाच्या परोपकारी कार्यांसाठी आणि भारताच्या संसाधनांचा विकास करण्यासाठी व विविध औद्योगिक उपक्रमांच्या स्थापनेसाठी समर्पित केली.

लंडन विद्यापीठात रतन टाटा फंडाची स्थापना केली : सर रतन टाटा यांना १९१६मध्ये नाइटची पदवी देण्यात आली होती. त्यांनी त्यांचे कार्य भारतापुरतेच मर्यादित ठेवले नाही. १९१२मध्ये त्यांनी लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समध्ये रतन टाटा सामाजिक विज्ञान आणि प्रशासन विभागाची स्थापना केली तसेच लंडन विद्यापीठात रतन टाटा फंडाची स्थापना केली. त्यांचे इंग्लंडमधील यॉर्क हाऊस, ट्विकेनहॅम येथे कायमस्वरूपी वास्तव्य होते. १९०९मध्ये त्यांनी रु. ५०,००० (२०२२ मध्ये अंदाजे रु. ४० दशलक्ष समतुल्य) महात्मा गांधींना ट्रान्सवालमध्ये काम करण्याच्या भारतीयांच्या हक्काच्या लढ्यात मदत करण्यासाठी दान केले होते. ते कलेचे उत्तम जाणकार होते. छत्रपती शिवाजी महाराज वास्तू संग्रहालय (पूर्वीचे प्रिन्स ऑफ वेल्स संग्रहालय)मध्ये सर रतनजी टाटा, सर दोराब टाटा आणि सर पुरुषोत्तम मावजी यांचे संग्रह प्रदर्शित करणारा एक विभाग आहे.

जमशेटजी टाटा यांच्या शेजारी दफन केले : भारतीय वैज्ञानिक आणि वैद्यकीय संशोधन संस्थेची (इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, खखड्ल) बंगळुरू येथे १९०५मध्ये स्थापना झाली. १९१२मध्ये टाटा स्टीलने मध्य प्रांतातील साकची येथे काम करण्यास सुरुवात केली, त्यात त्यांना लक्षणीय यश मिळाले. टाटा उद्योगांपैकी सर्वात महत्त्वाचे म्हणजे पश्चिम घाटातील जलशक्तीचा साठा करणे ज्यामुळे मुंबईला प्रचंड प्रमाणात विद्युत उर्जा उपलब्ध झाली आणि त्यामुळे त्यांच्या उद्योगांची उत्पादक क्षमता मोठ्या प्रमाणात वाढली. त्यांनी १८९३मध्ये नवजबाई सेटशी लग्न केले आणि १९१५मध्ये ते इंग्लंडला रवाना झाले. त्यांनी दूरच्या नातेवाईकाच्या कुटुंबातील नवल टाटा यांना दत्तक घेतले. ६ सप्टेंबर १९१८ रोजी कॉर्नवॉल, इंग्लंडमधील सेंट इव्हस येथे त्यांचे निधन झाले आणि त्यांना त्यांचे वडील (जमशेटजी टाटा) यांच्या शेजारी लंडनजवळील ब्रूकवुड स्मशानभूमी, वोकिंग येथे दफन करण्यात आले.


सर रतनजी जमसेदजी टाटा हे भारतीय उद्योगपती आणि दानशूर होते. हे जमसेटजी टाटा यांचे पुत्र असून त्यांच्या मृत्यूनंतर रतनजी आणि दोराबजी या भावांनी जमसेटजींचे उद्योग सांभाळले. त्यांनी अनेक ऐतिहासिक वस्तू एकत्र केल्या होत्या. १९२३मध्ये या वस्तू टाटांच्या कुटुंबियांनी प्रिन्स ऑफ वेल्स संग्रहालयाला (आताचे छत्रपती शिवाजी महाराज वस्तु संग्रहालय) दान केल्या. टाटांच्या मृत्यूनंतर १९१९ साली सर रतन टाटा ट्रस्ट ही समाजकारणी संस्था ८० लाख रुपयांसह (आताचे ७५ कोटी रुपये) स्थापन झाली. (साभार : इंटरनेट)

## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

# कॉफी पिण्यासाठी 'ही' 'सर्वोत्तम वेळ'; वाचा फायदे



कॉफी पिण्याची योग्य वेळ कोणती? कॉफीचे जास्तीत जास्त फायदे आपल्याला कधी मिळू शकतात? असा प्रश्न अनेकांना नेहमीच पडतो. सकाळी, संध्याकाळी की रात्री नक्की कधी कॉफी पिणे चांगलं आहे हे जाणून घेऊया. अनेकदा असं दिसून येतं की, लोक सकाळी उठताच उपाशीपोटी एक कप चहा किंवा कॉफी पितात. त्यांच्या दिवसाची सुरुवात कॉफीने होते.

उपाशीपोटी चहा किंवा कॉफी प्यायल्याने पोटात अॅसिड रिफ्लक्स होतं आणि त्यामुळे अॅसिडिटीची समस्या देखील वाढू शकते तसेच याचा पचनसंस्थेवरही वाईट परिणाम होतो. तज्ञांच्या मते, एका कप कॉफीमध्ये सुमारे १०० मिलीग्राम कॅफिन असतं, ते कॉफीच्या प्रकारावर देखील अवलंबून असतं. जेव्हा तुम्ही सकाळी उपाशीपोटी कॉफी पिता तेव्हा शरीरात कोर्टिसोलची लेव्हल वाढते आणि तुम्हाला अधिक ताण जाणवू शकतो.

दुसरीकडे, रात्री कॉफी प्यायल्याने तुमच्या झोपेवर परिणाम होऊ शकतो, त्याचा तुमच्या मेटाबॉलिज्मवर परिणाम होतो. अशा परिस्थितीत तज्ञांच्या मते, कॉफी पिण्याची योग्य वेळ सकाळी ९.३० ते ११दरम्यान असते, जेव्हा तुम्ही कॉफी पिण्याचे जास्तीत जास्त फायदे मिळवू शकता. यावेळी कोर्टिसोलची पातळी कमी असते आणि कॅफिनचा शरीरावर होणारा परिणाम कमी असतो. जर तुम्हाला दुपारचा थकवा दूर करण्यासाठी तुम्ही दुपारी २-३च्या दरम्यान एक कप कॉफीदेखील पिऊ शकता.

आपण एका दिवसात किती कॉफी पिऊ शकतो? असाही प्रश्न अनेकांना पडतो. एफडीआयनुसार एका दिवसात ४०० मिलीग्रामपेक्षा जास्त कॅफिनचं सेवन करू नये. त्याचवेळी महिलांनी गर्भधारणेदरम्यान फक्त २०० मिलीग्राम कॅफिनचं सेवन करावं. हे कॅफिन केवळ कॉफीमधूनच नाही तर चहा, चॉकलेट, सोडा, एनर्जी ड्रिंक्स आणि इतर उत्पादनांमधूनदेखील मिळतं. अशा परिस्थितीत तुम्ही दिवसातून एक ते दोन कप कॉफी पिऊ शकता.

# कर्जत रेल्वे फलाटावरील सरकते जिने २७ जानेवारीपासून सुरू होण्याची शक्यता

**कर्जत : प्रतिनिधी**


कर्जत रेल्वेस्थानकात फलाट क्रमांक १वरील मुंबई कडील सरकत्या जिन्यांचे काम अंतिम टप्प्यात होत आले असून हे दोन्ही जिने २७ जानेवारीपर्यंत सुरू होण्याची शक्यता आहे. असे रेल्वे प्रशासनाने कळविले आहे. या जिन्यांमुळे ज्येष्ठ नागरिक, महिला प्रवाशांची चांगली सोय होणार आहे.

कर्जत रेल्वेस्थानकात फलाट क्रमांक २वर रेल्वे प्रशासनाने काही वर्षापुर्वी सरकता जिना उपलब्ध करून दिला आहे. तसेच फलाट क्रमांक एक वर सुद्धा एक चढण्यासाठी व एक उतरण्यासाठी अशा दोन सरकत्या जिन्यांचे काम काही महिन्यांपासून सुरू आहे. या सरकत्या जिन्याचे काम अंतिम टप्प्यावर आले आहे. ते कधी पूर्ण होणार? आणि त्याचा उपयोग कधी होणार? असा प्रश्न प्रवासीवर्ग उपस्थित करीत आहे.

याबाबत कर्जत येथील सामाजिक कार्यकर्ते पंकज ओसवाल यांनी रेल्वे प्रशासनाकडे पाठपुरावा केला असता रेल्वे प्रशासनाने ओसवाल यांना दोन्ही सरकत्या जिन्यांचे काम प्रगतिपथावर आहे. हे सरकते जिने २७ जानेवारीपर्यंत सुरू होण्याचे शक्यता आहे, असे लेखी कळविले आहे.

**कर्जत येथील रेल्वे फलाट क्रमांक १वर असलेल्या सरकते जिन्यांचे काम लवकरात लवकर पूर्ण करावे व ते कर्जतकरांना उपलब्ध करून द्यावे. म्हणजे ज्येष्ठ नागरिक, महिला व अन्य प्रवाशांनाही या जिन्यांचा उपयोग होईल.**

**– पंकज ओसवाल, सामाजिक कार्यकर्ते, कर्जत**



## मध्य रेल्वे मुंबई विभागात सर्वाधिक कंटेनर रेक लोडिंग

**रोहे : प्रतिनिधी**

मुंबई विभाग मालवाहतुकीतील कामगिरी सुधारण्यासाठी आणि त्यांच्या कामगिरीत सुधारणा करण्यासाठी सतत प्रयत्नशील आहे.डिसेंबर–२०२४ महिन्यात मुंबई विभागात १.९८ दशलक्ष टन मालवाहतूक झाली. चालू आर्थिक वर्षात डिसेंबर २०२४पर्यंत १६.९४ दशलक्ष टन मालवाहतूक झाली आहे.

डिसेंबर २०२४मध्ये एकूण ७१८ कंटेनर रेक लोड करण्यात आले. हे एका महिन्यात आतापर्यंतचे सर्वाधिक कंटेनर रेक लोडिंग आहे, जे नोव्हेंबर २०२४मध्ये लोड केलेल्या ६८१ रॅकच्या मागील सर्वोत्तम लोडिंग पेक्षा अधिक आहे.

डिसेंबर २०२४ मध्ये दररोज सरासरी १५४३ वॅगन लोड करण्यात आले. जे आतापर्यंतचे सर्वोत्तम लोडिंग आहे, जे मार्च २०२४मध्ये दररोज लोड केलेल्या १५३५ वॅगनच्या मागील सर्वोत्तम लोडिंगला मागे टाकले आहे. डिसेंबर २०२४पर्यंत दररोज सरासरी १४५७ वॅगन लोड करण्यात आले. डिसेंबर २०२४ मध्ये दररोज सरासरी १०६.०६ मालगाड्या इंटरचेंज झाल्या.

मध्य रेल्वेकडून मेल/एक्सप्रेस गाड्या आणि विशेष गाड्यांचे संचालन करण्यात आले. डिसेंबर २०२४ मध्ये मुंबई विभागात एकूण ५७६५ मेल/एक्सप्रेस गाड्या चालवल्या गेल्या ज्या मागील वर्षीच्या याच कालावधीतील ५६१५ गाड्यांच्या तुलनेत २.७% वाढ दर्शविते.

## विभावरी सिंगासने आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषदेच्या पाचनंद केंद्रशाळेत कार्यरत असलेल्या विभावरी सिंगासने यांना त्यांनी केलेल्या उत्कृष्ट कार्याबद्दल प्राथमिक शिक्षक संघाच्या वर्धापन दिनी मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

विभावरी सिंगासने या गेली २५ वर्ष अध्यापनाचे कार्य करत असून, आतापर्यंत त्यांनी अनेक विद्यार्थी घडविले असून, प्रसंगी पदरमोड करून विद्यार्थ्यांना फी, शैक्षणिक साहित्य कपडे या रूपाने मदत केली आहे, व करत आहेत, तळोजे पाचनंद शाळेला मुख्यमंत्री माझी शाळा ,सुंदर शाळा स्पर्धेत शाळेला प्रथम क्रमांक मिळवून देण्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे.

राष्ट्रीय एकात्मता, दिवाळीच्या वेळी आकाशकंदील, पतंग, विविध प्रकारचे शैक्षणिक साहित्य स्नेहसंमेलन, गुणवत्ता वाढ यासारखे अनेक वेगळे उपक्रम राबवून त्यांनी शाळेला वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले आहे, या पुरस्काराने माझी जबाबदारी वाढली असून यापुढे ही माझे कार्य अखंड सुरू राहील, असे त्यांनी सांगितले. त्यांच्या या यशाबद्दल गटशिक्षणाधिकारी मोहिते साहेब, केंद्रप्रमुख मोकल, मुख्याध्यापिका श्रीमती पाटील, यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.



## खालापूर तालुका वनविभागाच्या वतीने पाणपक्ष्यांची प्रगणना



**मोहोपाडा, चौक : प्रतिनिधी**

अपर प्रधान मुख्य वनरक्षक महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने हिवाळी पाणपक्षांची प्रगणना करण्याकरिता १९ जानेवारी २०२५ रोजी जागतिक संस्थेने ठरविलेल्या निकषानुसार खालापूर तालुका वन विभागाने तालुक्यातील विवीध पाणस्थळावर सर्वेक्षण कार्यक्रम आयोजित केला होता.

विवीध पाणस्थळावर स्थानिक प्रजाती सोबत विदेशी पक्षी निरीक्षण आणि प्रगणना करण्याकरिता वन खात्याचे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या सोबत पक्षी मित्र तसेच हेल्प फाउंडेशन सारख्या संस्थानी देखील सहभाग घेतला होता.

खालापूर तालुका वनाधिकारी राजेंद्र पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्व नियोजित सर्वेक्षण कार्यक्रमानुसार पहाटेपासून सूर्योदय झाल्यानंतर काही वेळ संपूर्ण महाराष्ट्रासह खालापूर तालुक्यातल्या पाणस्थळावर पक्षी निरीक्षण करून नोंद करण्यात आली.

## नज अकॅडमीच्या सुश्मिता दासला जिल्हा विज्ञान प्रदर्शनात दुहेरी यश

**मुरूड : प्रतिनिधी**

पनवेल येथील बांठीया हायस्कूलमध्ये दोन दिवशी पार पडलेल्या बावन्नाव्या रायगड जिल्हा विज्ञान प्रदर्शनात मुरूड तालुक्यातील मजगावच्या नज अकॅडमी हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयातील अकरावी विज्ञान शाखेतील विद्यार्थीनी सुश्मिता उत्तम दास हीने प्रदर्शनाच्या निमित्ताने घेण्यात आलेल्या वक्तृत्व स्पर्धेत प्रथम क्रमांक तर निबंध लेखन स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळवून दुहेरी यश प्राप्त केले.

मुरूड तालुका विज्ञान प्रदर्शनात इ.९ वी ते बारावीच्या गटात सुश्मिता दास व सुप्रिया दामाद यांनी तयार केलेल्या 'कचरा व्यवस्थापन' या प्रतिकृतीला प्रथम क्रमांक मिळून सदर प्रतिकृती जिल्हा विज्ञान प्रदर्शनास पात्र ठरली होती. विज्ञान प्रदर्शनासह काही पुरक उपक्रम घेतले जातात.त्यातील निबंध लेखन व वक्तृत्व स्पर्धेत सुश्मिता सहभागी झाली होती. तिला प्रा.शहजान उलडे, प्रा.प्रितम वाळंज, प्रा.दिलशाद दामाद, अलमास कोकाटे,नईमा चोगले आदींनी मार्गदर्शन केले. नज एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष व सर्व संचालक तथा मुख्याध्यापिका मेघा भंडारे ,एच ओ डी.मतीन हमदुले यांनी तिचे अभिनंदन केले.



## माथेरान प्रेस क्लब अध्यक्षपदी गिरीष पवार

**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरान प्रेसक्लब अध्यक्षपदी सर्वानुमते गिरीष पवार यांची निवड करण्यात आली.सामाजिक कार्यकर्ते तथा माथेरान प्रेसक्लब सदस्य असलेले गिरीष पवार यांची एकमताने अध्यक्षपदी निवड झाली.या निवडीबद्दल सर्व स्थरातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

गुरुवार दि.१६ रोजी येथील सुप्रसिद्ध रिगल हॉटेल येथे सायंकाळी ६वा.माथेरान प्रेसक्लबची सर्वसाधारण सभा पार पडली.सदर सभेत पुढील दोन वर्षांकरिता माथेरान प्रेसक्लबची नवीन कार्यकारणी सर्वानुमते निवडण्यात आली.

यामध्ये माथेरान प्रेसक्लब अध्यक्षपदी जेष्ठ पत्रकार गिरीष पवार यांची एकमताने निवड करण्यात आली.कार्याध्यक्षपदी कोकणवासीय समाज संस्था अध्यक्ष तथा पत्रकार चंद्रकांत सुतार,उपाध्यक्षपदी संजय भोसले,सचिवपदी पुन्हा एकदा संतोष खाडे आणि खजिनदार या पदासाठी दिनेश सुतार यांची निवड करण्यात आली.यावेळी नवनिर्वाचित अध्यक्ष गिरीष पवार यांनी सर्वांचे आभार व ऋण व्यक्त केले. तसेच आपल्या मनोगतात बोलताना म्हणाले की माथेरान प्रेसक्लबच्या वतीने दर वर्षी होत असलेले विविध सामाजिक उपक्रम आपण उत्तमरीत्या राबवित असून यापुढेही सर्वांच्या सहकार्याने उत्तम कार्यक्रम आपण राबविणार आहोत.आता लवकरच माथेरान प्रेसक्लब चा वर्धापनदिन असून या दिवशी आपण एखादा सामाजिक कार्यक्रम हाती घेऊयात असेदेखील त्यांनी सांगितले.



## विश्वनिकेतनमध्ये आंतरराष्ट्रीय कार्यशाळा



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

पाताळगंगा परिसरातील कुंभविली–खालापूर येथील विश्वनिकेतन इंजिनिअरिंग सहा दिवसीय आंतरराष्ट्रीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेचे उद्घाटन प्रमुख पाहुणे प्रा. भूपेश दहेरीया यांच्या हस्ते करण्यात आले.

या वेळी संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. संदीप इनामदार यांनी स्वीडन व फिनलँड या देशातून आलेल्या प्राध्यापक डॉ. दाविदे फुस्सी आणि डॉ. राहुल मोहनानी यांचे स्वागत केले. अध्यक्ष भाषणामध्ये प्रा. भूपेश दहेरिया यांनी आर्टिफिशियल इंटेलिजन्स, मशीन लर्निंग यांचे आपल्या दैनंदिन, व्यवहारिक जीवनामध्ये असलेले महत्त्व, शैक्षणिक व्यवस्था यावर भाष्य केले. या सहा दिवसीय कार्यशाळे कार्यशाळेमध्ये डॉ. दाविदे फुक्सी आणि डॉ. राहुल मोहनानी यांनी विद्यार्थ्यांना सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट लाइफ सायकल या विषयावरती सॉफ्टवेअर कसे डिझाईन करायचे, डेव्हलप कसं करायचे आणि त्याची डिलिव्हरी कशी करायची याबाबत मार्गदर्शन केले. या कार्यशाळेचा फायदा १२० विद्यार्थ्यांनी घेतला.

या वेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाबासाहेब पाटील, उपप्राचार्य डॉ. शंकर कदम, पीबीएलसीओइ डायरेक्टर डॉ. विकास शिंदे, कम्प्युटर सायन्स अँड इंजीनियरिंग (एआय एमएल) चे विभाग प्रमुख डॉ. अंकुश पवार उपस्थित होते. या कार्यशाळेचे आयोजन कंप्युटर सायन्स अँड इंजीनियरिंग (एआय एमएल) विभागाने केले होते.

## कै. दत्ताजीराव तटकरे यांच्या जयंतीनिमित्त सायकल वाटप

**माणगाव : बातमीदार**

राष्ट्रवादीच्या ज्येष्ठ कार्यकर्त्या व हि.म. मेथा विद्यालय विळेच्या संचालिका देविका पाबेकर या विद्यार्थ्यांच्या अडचणी त्या जाणून घेतात. दूरवरून चालत शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांची अडचण लक्ष्यात येताच त्यांनी ही बाब नुकतेच महिला व बालकल्याणमंत्री आदिती तटकरे यांच्या निदर्शनात आणून दिली. आदितीताईंनी मग त्यांचे आजोबा कै. दत्ताजीराव गणपतरावं तटकरे यांच्या ९७व्या जयंती निमित्त सुनील तटकरे युवा प्रतिष्ठान व वरदाई चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने निजामपूर, विळे व पाटणूस, भिरा येथे अति दुर्गम भागातून शिक्षणासाठी येणाऱ्या गरजू विद्यार्थांना सायकल वाटप केले. या सायकल मिळाल्याने विद्यार्थी आता वेळेवर शाळेत येऊ शकतील शिवाय त्यांना अभ्यासालाही पुरेसा वेळ मिळू शकणार आहे.

आदितीताईंनी यापूर्वी देखील महिलांसाठी अनेक योजना राबविल्या आहेत त्यामध्ये प्रामुख्याने लाडकी बहीण योजना, बचत गटाच्या महिलांना विविध योजना, शालेय विद्यार्थिनींना सॅनेटरी पॅडचे वाटप या सारख्या अनेक योजना त्यांनी राबविल्या आहेत.सायकल वाटपच्या कार्यक्रमास व्यस्त कार्यक्रमामुळे आदिती ताई प्रत्यक्ष उपस्थित राहू शकल्या नाहीत. त्यांचे पी.ए.अनिकेत पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत देविका पाबेकर, राष्ट्रवादी कार्यकर्ते जतीन महाडिक, सुधाकर शिंदे, दिपक महाळुंगे, प्रवीण सावंत, सिद्देश पाबेकर, वसंत पोळ, महेश चालके, सागर भालेराव, पाटणूसच्या माजी सरपंच नीलिमा निगडे, हि. म मेथा विद्यालय विळे, संस्थेचे अध्यक्ष परशुराम कोदे सदस्य पांडुरंग नलावडे गणेश सकपाळ मनोहर धामुनसे, संतोष बामणे, नथुराम पाटणकर, संजय कोदे, मुख्याध्यापक शिरसाट, टाटा विद्यालय भिरा मुख्याध्यापक काव्या अडीत, पाटणूस मुख्याद्यापक मोराळे, कार्यकर्ते, विळे ग्रामस्थ, पालक व विद्यार्थी उपस्थित होते.



## संजीवनी आरोग्यसेवा केंद्रात रुग्णांना उत्तमोत्तम सुविधा देणार - पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने

**मुरूड : रामप्रहर वृत्त**

संजीवनी आरोग्य सेवा केंद्राच्या उत्थानासाठी अनेक देणगीदारांचे मदतीचे हात पुढे आल्यामुळेच ५ वर्षांपासून डायलेसिस , इको आदी सुविधा चांगल्या पद्धतीने आपण संजीवनी आरोग्य सेवा केंद्रामार्फत देऊ शकलो आहोत. आगामी काळात ही असेच मदतीचे हात पुढे येऊन भविष्यात संजीवनी हे मुरुडचे सर्व सोयीनी युक्त अशा उत्तमोत्तम सेवा देणार, असा विश्वास व्यक्त करत नेत्र शल्य चिकित्सेसाठी बाह्य रुग्ण विभाग या केंद्रात सुरु करणार असे प्रतिपादन पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने यांनी केले .

संजीवनी आरोग्य केंद्रात अल्फॉन इंडिया प्रा . लि . कंपनी तर्फे देण्यात आलेल्या मेडिकल साहित्याचे उद्घाटन करतांना डॉ. लहाने संजीवनी केंद्रात नेत्र



चिकित्सा व डायलेसिस रुग्णांना मार्गदर्शन करताना डॉ लहाने बोलत होते. आपल्या भाषणात त्यांनी संजीवनी केंद्रासमोर अडचणी आल्या असल्या तरी मार्ग निघत गेला असे सांगुन न डगमगता हाती घेतलेले कार्य जोमाने पुढे नेण्याचे आवाहन केले.

या वेळी विभाग प्रमुख डॉ. मकबुल कोकाटे यांनी संजीवनी आरोग्य केंद्रात एकूण १० मशीन्स डायलेसिसच्या असुन कॉर्डीक ॲब्युलन्स व अन्य उपकरणे दातृत्वातून व डॉ. लहाने व डॉ . रागिणी पारेख यांच्या पुढाकारातून मिळाल्याचे सांगितले.

डॉ. रागिणी पारेख यांनी सेवाभावी वृत्तीने काम करणाऱ्या अनिता बामकोडे व रविंदर बोपराई या सिस्टर्सच्या योगदानाबद्दल धन्यवाद दिले .

डॉ. तात्याराव लहाने व डॉ. रागिणी पारेख यांनी मुंबई येथे मुरुडच्या २१ जणांवर मोफत नेत्र चिकित्सा करण्यात आलेल्या रुग्णांची पुर्नतपासणी करून दिलासा दिला. नवीन मजगावच्या किरण दिलीप सुर्वे या युवकाच्या डोळ्यावर रघुनाथ नेत्र रुग्णालयात डॉ . लहाने यांनी यशस्वी शस्त्रक्रिया करून दृष्टी प्राप्त करून दिल्याबद्दल त्याचा आनंदी चेहरा दिसून आला.

अल्कॉन इंडिया कंपनीने दहा लाखांचे मेडिकल साहित्य दिल्या बद्दल कार्याध्यक्ष विजय सुर्वे यांनी आभार व्यक्त केले .यावेळी कार्याध्यक्ष विजय सुर्वे , उपाध्यक्ष चंद्रकांत अपराध , अजित गुरव, आदेश दांडेकर , कीर्ती शहा,मंगेश दांडेकर , जहूर कादिरी , अमित कवळे , जयंत चौलकर , नयन कर्णिक , वासंती उमरोटकर , हसमुख जैन , नितीन अंबुर्ले , सुऐल डावरे , उषा खोत , अनघा चौलकर उपस्थित होते .

## शिवनगर येथे वास्तव्यास असलेल्या बांगलादेशी नागरिकास अटक

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

देशात बेकायदा वास्तव्यास असलेल्या बांगलादेशी नागरिकांविरोधात पोलिसांनी कारवाईची मोहीम उघडली असून १२ वर्षापासून घुसखोरीच्या मार्गाने भारतात प्रवेश करून शिवनगर–मोहोपाडा येथे बेकायदा वास्तव्यास असलेल्या मोहसीन खोकोन मुल्ला याला पोलिसांनी अटक केली आहे.

बारवई पूल येथे मांडे वडापाव सेंटर, खानावळे येथे एक बांग्लादेशी नागरिक कामासाठी येणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीनुसार पोलिसांचे पथक सदर ठिकाणी पोहोचले. यावेळी – एक इसम वडापाव सेंटर समोर उभा होता. त्याला त्याचे नाव विचारले असता, मोहसीन खोकोन शेख, रा. शिवनगर–मोहोपाडा असे असल्याचे त्याने सांगितले. पोलिसांनी त्याच्याकडे भारतीय असल्याबाबतचे कागदपत्र त्यास सादर करण्यास सांगितले आणि त्याच्याकडे असलेला मोबाईल फोन तपासला असता, बांगलादेशी कॉलिंग कंट्री कोडने सुरु होणारे संपर्क मिळून आले. त्याच्याकडे बांग्लादेशातून भारतात येण्याचे पासपोर्ट, विजा, जन्म दाखला, इतर कागदपत्र मागितले असता, त्यांनी ती दिली नाहीत. मात्र त्याच्याकडे आधार कार्ड, मोबाईल फोन मिळून आला.

बारा वर्षांपूर्वी भारत–बांगलादेश सीमेवरील गस्तीवरील पथकाची नजर चुकवून त्याने भारतात प्रवेश केला आणि तो रसायनी परिसरात राहत असल्याचे त्याने पोलिसांसमोर कबूल केल्याने त्याच्या विरोधात गुन्हा दाखल करून त्यास पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

### जाहीर प्रसिध्दीकरण

पुढे नमुद केलेल्या सहकारी संस्थेचे सन २०२४ ते २०२९ या कालावधीतील पंचवार्षिक निवडणूकीसाठी निवडणूक कार्यक्रम प्रसिध्द करण्यांत येत आहे. संस्थेचे नाव नावडे नागरी सहकारी पतसंस्था मर्या, ता. पनवेल, जि.रायगड. असे असून सदर कार्यक्रमानुसार नामनिर्देशन पत्र स्विकृती दि. २१/०१/२०२५ ते २७/०१/२०२५, नामनिर्देशन पत्र छाननी दि. २८/०१/२०२५, नामनिर्देशन पत्र माघारी दि.३०/०१/२०२५ ते १३/०२/२०२५ व आवश्यकतेनुसार मतदान अनुक्रमे दिनांक २३/०२/२०२५ रोजी घेण्यांत येईल तपशिलवार निवडणूक कार्यक्रम, निवडणुकीबाबत सूचना व अधिक माहीती नावडे नागरी सहकारी पतसंस्था मर्या, ता. पनवेल, जि. रायगड या संस्थेचे कार्यालयांत पहावयास मिळेल तरी संस्थेच्या सभासदांनी याची नोंद घ्यावी.

**सही/–**
**(सुरेखा पाटील)**
**निवडणूक निर्णय अधिकारी**

# 'कोल्ड प्ले कॉन्सर्ट'नंतर स्वच्छता मोहीम

## मोठा कार्यक्रम होऊनही सकाळी रस्ते व परिसर स्वच्छ; नागरिकांकडून प्रशंसा

**नवी मुंबई : बातमीदार**

कोल्ड प्ले कॉन्सर्ट हा आंतरराष्ट्रीयस्तरावर लोकप्रिय संगीतमय कार्यक्रम बघण्यासाठी देशातून व जगभरातून मोठ्या संख्येने संगीत रसिकांची उपस्थिती होती. नवी मुंबईच्या स्वच्छ शहर लौकिकाला बाधा पोहोचू नये यासाठी स्वच्छता समुहांच्या वतीने कार्यक्रम स्थळाचा परिसर व कार्यक्रम स्थळाच्या परिसरातील मुख्य रस्ते यांची सखोल स्वच्छता मोहीम लगेचच हाती घेण्यात आली. सकाळी स्वच्छ रस्ते व परिसर पाहुन नागरिकांकडून प्रशंसा पालिका प्रशसनाची करण्यात आली



नेरूळ येथे १८, १९ व २१ जानेवारी रोजी संपन्न होत असलेल्या 'कोल्ड प्ले' हा आंतरराष्ट्रीयस्तरावर लोकप्रिय संगीतमय कार्यक्रम बघण्यासाठी देशातून व जगभरातून मोठ्या संख्येने संगीत रसिकांची उपस्थिती असणार हे लक्षात घेत नवी मुंबईच्या स्वच्छ शहर लौकिकाला बाधा पोहोचू नये अशा रितीने हा कार्यक्रम 'शून्य कचरा कार्यक्रमात' स्वरूपात साजरा व्हावा याकरिता नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सूक्ष्म नियोजन करण्यात आले होते.

या नियोजनानुसार कार्यक्रम स्थळाच्या अंतर्गत भागात कार्यक्रम संध्याकाळचा असला तरी दुपारी २ वाजल्यापासून १५० हून अधिक परिसर सखींच्या सहयोगाने कचऱ्याचे वर्गीकरण सुरू ठेवण्यात आले होते. त्याचप्रमाणे १० वाजता कार्यक्रम संपल्यानंतर अतिरिक्त आयुक्त सुनील पवार यांच्या नियंत्रणाखाली, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे परिमंडळ १ उपायुक्त डॉ. अजय गडदे यांच्या माध्यमातून, नेरूळ, बेलापूर, वाशी, तुर्भे विभागांचे सहाय्यक आयुक्त तथा विभाग अधिकारी यांच्या सहयोगाने स्वच्छता समुहांच्या वतीने कार्यक्रम स्थळाचा परिसर व कार्यक्रम स्थळाच्या परिसरातील मुख्य रस्ते यांची सखोल स्वच्छता मोहीम लगेचच हाती घेण्यात आली.

पहाटे ३ वाजेपर्यंत १०० हून अधिक स्वच्छतामित्रांच्या समर्पित सहयोगाने हा संपूर्ण परिसर स्वच्छ करण्यात आला. ७५ हजारहून अधिक लोकांच्या उपस्थितीत झालेला हा बिग इव्हेंट असूनही असूनही सकाळी कार्यक्रम स्थळाच्या परिसरातील रस्ते स्वच्छ पाहून जॉगिंगला तसेच सकाळीच फेरफटका मारण्यासाठी घराबाहेर पडणाऱ्या नवी मुंबईकर नागरिकांनी महानगरपालिकेच्या स्वच्छता विभागाचे व स्वच्छताकर्मींच्या स्वच्छतेप्रती समर्पित कार्याचे मुक्तकंठाने कौतुक केले आहे. अशाच प्रकारचे स्वच्छतेप्रती सेवाभावी योगदान व जागरूकता नवी मुंबईला स्वच्छतेमध्ये देशात पुढे ठेवण्यासाठी मोलाची ठरते असेही अभिप्राय नागरिकांकडून व्यक्त करण्यात आले.

कार्यक्रम झाल्यानंतर साधारणत: ११ वाजल्यापासून पहाटे ३ वाजेपर्यंत शंभर स्वच्छतामित्रांच्या समूहाने 'सखोल स्वच्छता' अर्थात 'डीप क्लीनिंग' करण्यास सुरुवात केली. कार्यक्रम स्थळाभोवतालचा परिसर स्वच्छ करण्यासोबतच भीमाशंकर समोरील पार्किंग ते एलपीपर्यंतचा सर्विस रोड, एलपी रोड ते एसआयईएस कॉलेज, एसआयईएस कॉलेज ते शनी मंदिर रोड अशाप्रकारे कार्यक्रम स्थळाच्या भोवतालचे सर्व मुख्य रस्ते सखोल स्वच्छता मोहीम राबवित स्वच्छ करण्यात आले. या ठिकाणची कचरा वाहतूक करण्यासाठी मोहिमेमध्ये दहा कचरा संकलन वाहने अथक कार्यरत होती. तसेच या रस्त्यांवरील लिटर्स बिन स्वच्छ करण्यासाठी दिवसभर कचरागाड्या फिरत होत्याच.

शनिवार (दि.१८)रोजी कार्यक्रम जरी संध्याकाळी असला तरी दुपारी २ वाजल्यापासूनच स्टेडियमच्या अंतर्गत भागात शून्य कचरा कार्यक्रमांतर्गत स्वच्छ भारत मिशनच्या प्रमाण कार्यप्रणालीनुसार १५०हून अधिक परिसर सखी आतील कचऱ्याचे वर्गीकरण करण्यासाठी कार्यरत होत्या. त्या ठिकाणी जमा झालेल्या प्लास्टिक बॉटल्सचे रिसायकलिंग करण्यासाठी बिसलेरी कंपनीच्या वतीने त्या उचलून नेण्यात आल्या. या ठिकाणचा वर्गीकृत कचरा लगेचच कचरा गाड्यांतून वाहून नेण्यात आला.

### २२ जानेवारीपर्यंत नियोजन

कार्यक्रमाच्या वेळी अशा प्रकारचे नियोजन करण्यासोबतच कार्यक्रम झाल्यानंतरही कार्यक्रम स्थळ व परिसर नीटनेटका करण्यासाठी विशेष स्वच्छता पथक नियुक्त करून सखोल स्वच्छता मोहीम यशस्वी करण्यात आली. अशाच प्रकारच्या सखोल स्वच्छता मोहिमा कोल्ड प्ले कॉन्सर्टच्या दिवशी २२ जानेवारीपर्यंत अशाच प्रभावीपणे राबविल्या जाणार आहेत. नवी मुंबई महानगरपालिकेच्या स्वच्छतेप्रती असलेल्या या समर्पित उपक्रमाची नोंद नागरिकांनी तर घेतलीच; त्यासोबतच नवी मुंबईचा स्वच्छतेसाठी पुढाकार राष्ट्रीय पातळीवरही नोंदविला जात आहे.

# आमदार मंदा म्हात्रेंकडून पंतप्रधानांना कार्य अहवाल

**नवी मुंबई : बातमीदार**



देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत महाराष्ट्रातील सर्व आमदारांची बैठक ही आयोजित करण्यात आली होती. यावेळी बेलापूर विधानसभा क्षेत्राच्या आमदार मंदा म्हात्रे देखील उपस्थित होत्या. आ. म्हात्रे यांनी १५१ बेलापूर विधानसभा क्षेत्रामध्ये आतापर्यंत केलेल्या ५ वर्षातील विविध विकास कामांचा कार्यअहवाल देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना सुपूर्द केला.मोदींनी आ.म्हात्रे यांच्या कार्य अहवालाची स्तुती केली.

पंतप्रधान मोदींनी अहवाला न्याहाळत पुढील काळात काय करणार असा प्रश्न मंदा म्हात्रे यांना विचारला. यावेळी मंदा म्हात्रे यांनी त्यांना आगामी व्हिजन बाबत माहिती दिली. यात कचऱ्यापासून ऊर्जा निर्माण करणे, तसेच दिवाळेगाव आधी व त्यानंतर स्मार्ट झालेल्या गावाची छायाचित्र या वेळी पंतप्रधानांना दाखवली. यासह सौर ऊर्जेवर आधारित प्रकल्प राबविण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे सांगत प्रकल्पाची माहिती दिली.मंदा म्हात्रे यांनी दिलेल्या माहितीने व कार्याहवालाने मोदींनी प्रभावित होऊन आ. म्हात्रे यांची स्तुती केली तसेच नवी मुंबईतील विविध विषयांवर देखील चर्चा करण्यात आल्याचे मंदा म्हात्रेनी माहिती देताना सांगितले.

> **सर्व सुखी होवोत, सर्व निरोगी होवोत या अर्थाच्या सुभाषिताशी माझे नातं जोडले गेलं आहे. नवी मुंबईकरांशी माझं जिव्हाळ्याचं नातं आहे, कारण नवी मुंबईकरांनी माझ्यावर नेहमीच प्रेम केलं व त्यांनी मला सन्मान मिळवून दिला, प्रतिष्ठा मिळवून दिली ते मी कधीही विसरणार नाही. गतवेळी सांगितल्याप्रमाणे मी विविध विकास कामे पूर्णत्वास नेली असून त्याचे लोकार्पणही झाले आहेत. यापुढेही नवी मुंबईचा सर्वांगीण विकास हेच माझे ध्येय राहणार आहे.**
> **-आमदार मंदा म्हात्रे, बेलापूर विधानसभा क्षेत्र**

# अंनिस सभासद नोंदणी अभियान



**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या नवी मुंबईतील सानपाडा शाखेतर्फे सभासद नोंदणी अभियान राबवण्यात आले. अभियान दिनांक १८ जानेवारी रोजी नेरूळ सेक्टर ९ मधील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानाजवळ पार पडले.

उपस्थित लोकांना महा. अंनिसच्या प्रबोधनात्मक कामाची ओळख करून दिली. महा. अंनिस. समाजाला डोळस बनवते. भाबडेपणाने वागणे, आपल्या जीवनाचे नियंत्रण दुसर्याकडे जाणे यात परावर्तित होऊ शकते. म्हणून स्वतः तपासून घेऊन, आपले जीवन विवेकी बनवूया. महा. अंनिसने विविध पुस्तके प्रकाशित केली आहेत. 'अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका मासीक' नियमित प्रकाशित केले जाते. यांच्या माध्यमातून आपल्या शहरातील, जिल्ह्यातील, राज्यातील, देशभरातील अंधश्रद्धा मांडल्या जातात. यांच्या नियमीत वाचनामुळे, वाचक जागृत होतात. समाजाला जागृत करण्याचे काम आपण आपल्या पातळीवर करावे.

या कामाचा भाग म्हणून महा. अंनिसशी जोडून घेणे गरजेचे आहे. म्हणून सभासद नोंदणी अभियान राबवण्याबाबत आले. 'महा. अंनिसशी जोडून घेऊया व जागृत समाज निर्माण करूया' असा संदेश देण्यात आला. सभासद नोंदणी अभियानात राजेंद्र पंडीत, किरण जोशी, दिपरत्न सुरडकर व अशोक निकम यांनी सक्रिय सहभाग नोंदवला.

# चिरनेर महागणपतीच्या दर्शनासाठी गर्दी

**उरण : वार्ताहर**

तीर्थक्षेत्र चिरनेर नगरीत काल शुक्रवारी १७ जानेवारी रोजीच्या संकष्टी चतुर्थी निमित्ताने , भाविकांनी श्री महागणपतीच्या दर्शनासाठी पहाटेपासूनच, गर्दी केली होती. उरण, पनवेल, पेण, नवीमुंबईसह मोठ्या संख्येने गणेश भक्त दाखल झाले होते. विशेषता छोट्या-मोठ्या व्यवसायिकांचा व्यवसाय, परिसरातील दुकाने ग्राहकांनी गजबजली होती. शोभिवंत वस्तूंची दुकाने, हॉटेल,नारळ, हार, फुले व पापड, भाजीपाला विक्रेते, प्रसाद व पेढेवाले सुखावले होते. श्री महागणपती मंदिर परिसरात रानमेवा घेऊन अनेक आदिवासी व आगरी समाजाच्या महिला विक्रेत्या विक्री करताना दिसून आल्या. भाविकांच्या सोयीसाठी श्री गणपती देवस्थानतर्फे चोख व्यवस्था करण्यात आली होती.





**पनवेल : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी मन की बात या कार्यक्रमाच्या माध्यमातून देशवासीयांशी संवाद साधला. या ११८व्या भागाच्या थेट प्रक्षेपणाचे आयोजन भाजप नेते विश्वनाथ कोळी यांच्या गव्हाण येथील निवासस्थानी करण्यात आले होते. या वेळी भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, गव्हाण ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच विजय घरत, जयवंत देशमुख, ईश्वर कोळी, सुहास भगत, हेमंत ठाकूर, सुदर्शन घरत, प्रमोद कोळी, विनायक कोळी, भगवान कोळी, अनिल कोळी, बाळकृष्ण कोळी, भरत कोळी, चंदकांत कोळी, समीर कोळी, स्वयम कोळी, भगवान कोळी, प्रमोद कोळी आदी उपस्थित होते.**

# पनवेल आरटीओ कार्यालयात येणाऱ्या दिव्यांगासाठी व्हीलचेअर

**खारघर : प्रतिनिधी**

पनवेल आरटीओ कार्यालयात येणाऱ्या दिव्यांग बांधवाना होणारी अडचण लक्षात घेता आरटीओचे अधिकारी निलेश धोटे यांनी दिव्यांग बांधवासाठी व्हील चेअर याठिकाणी कायमस्वरूपी असावी अशी इच्छा सामाजिक कार्यकर्ते सुनील सूचक यांच्याकडे व्यक्त केली होती. त्यानुसार सूचक यांनी आरटीओ कार्यालयाला व्हीलचेअर भेट दिली.



वाहनांच्या कामानिमित्त दिव्यांग बांधव मोठ्या संख्येने पनवेल आरटीओ कार्यालयात येत असतात, मात्र या ठिकाणी दुव्यांगाची होणारी गैरसोय आरटीओ धोटे यांच्या लक्षात आली. त्यांच्या विनंतीवरून एचएम मोटर्सचे सुनील सूचक यांनी व्हीलचेअर भेट दिली.

# गुळसुंदे येथील मीनेश गाडगीळ यांनी सुरू केले सातेरी मधमाशी पालन

**पनवेल : वार्ताहर**

गुळसुंदे येथील कृषीभूषण प्रगतशील शेतकरी मीनेश गाडगीळ यांनी त्यांच्या शेतात त्यांनी अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम राबवलेले आहेत. या वर्षी त्यांनी सातेरी मधमाशी पालन चालू केले असून शेतकऱ्यांनी आपल्या शेतात मधमाशी पालनासाठी योग्य त्या पिकांची लागवड करुन मधमाशी पालन करुन मधाचे उत्पादन घ्यावे, असे आवाहनही त्यांनी केले आहे.



मधमाशी पालनाच्या अनुषंगाने आवश्यक झाडे गाडगीळ यांनी आपल्या शेतावरच्या बांधावर लावलेली आहेत. मधमाशी पालन केल्याने पिकांच्या परागीभवनास खूप मदत होते व शेतातील उत्पादन वाढते. त्याच प्रमाणात मधाचे उत्पादनही शेतकऱ्यास मिळते. शुद्ध मधाला बाजारात विशेष मागणी आहे.

मधाचे पृथ्थकरण केल्यास त्यामध्ये असणाऱ्या पोलनच्या संख्येनुसार मधाचा प्रकार ठरवला जातो. म्हणजेच जर मधामध्ये ४५% पोलन हे तुळशी फुलातील असतील तर तो तुळशीचा मध ग्राह्य धरला जातो, याप्रमाणेच जांभुळ, शेवगा, लीची, कडुलिंब, ओवा, वाईल्ड फ्लोरा या फुलवरचे मध उपलब्ध होतात. ज्या मधामध्ये पोलनचे प्रमाण हे ४५% एव्हढे कुठल्याच स्पेसिफिक फुलाचे भरले नाही व मिक्स पोलन असतील तर तो मध मल्टीफ्लोरा म्हणीन गणला जातो.

स्पेसिफिक फुलांचा मध हा शरीरास अतिशय गुणकारी समजला जातो, ज्याचा उपयोग रोगप्रतिकारक शक्ती वाढ, मधुमेह नियंत्रण, ओमेगा फॅटी ॲसिडचा पुरवठा, पचनक्षमता वाढवणे, स्नायूंची बळकटी, हृदयरोग नियंत्रण, मानसिक आरोग्य नियंत्रण, रक्तदाब नियंत्रण, व्हिटॅमीन्सचा पुरवठा इ साठी होतो. साधारण एक मधमाशीपालनची पेटी ठेवल्यास वर्षाला ५-६ कीलो मध जमा करता येतो व सदर पेटीतील राणी माशी ही तीन वर्षे सदर पेटीत वास्तव्यास राहते, त्यामुळेच ३ वर्षापर्यंत सदर पेटीतुन मध जमा करता येतो.

वर्षाला १५ हरीं मध एका पेटीतुन जमा झाल्यास कमीतकमी शुद्ध मधाचा दर १०००/- कीलो पकडल्यास १५,०००/ॲाडिशनल इन्कम शेतकर्याला मधमाशी पालनातुन मिळू शकेल व सदर पेटतील राणीमाशी पासुन नवीन राणीमाशी उत्पादीत करुन ती नवीन पेटीत भरता येते म्हणजे योग्य प्रमाणात प्रशिक्षण घेतल्यास एका पेटी पासुन अनेक मधमाशीपालन च्या पेट्या आपण करु शकतो.

आपल्या जिल्ह्यातील परिसर हा मधमाशी पालनासाठी अत्यंत अनुकुल असा आहे व आपण सातेरी, युरोपियन व डंखरहीत मधमाशी पालन करु शकतो. कृषी विभागाने पुढाकार घेउन जास्तीत जास्त शेतकऱ्यांना व अदिवासी बांधव मधमाशीपालन संदर्भात प्रशिक्षण देऊन रोजगार उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे, जेणेकरुन शेतकऱ्यांच्या शेती उत्पादनात वाढ होईलच त्याबरोबरच वार्षिक उत्पन्नात ही वाढ होईल, असे मिनेश गाडगीळ यांचे म्हणणे आहे.

# उरण महाविद्यालयात वाचन संकल्प अभियान

**उरण : बातमीदार**

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयात वाचन पंधरवडा राबविण्यात येऊन वाचन संकल्प महाराष्ट्राचा हा उपक्रम घेण्यात आला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. जी. लोणे यांच्या मार्गदर्शनानुसार विविध कार्यक्रम घेऊन हा पंधरवडा साजरा करण्यात आला. या उपक्रमाकरिता महाविद्यालयाचे शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी यांनी सक्रिय सहभाग घेतला.



१ जानेवारी रोजी सकाळी साडेदहा वाजता सर्व विद्यार्थ्यांनी ग्रंथालय अभ्यासिकेत एक तास एकत्रित वाचन केले. या सामूहिक वाचनानंतर दररोज नियमित वाचन करण्याचा संकल्प विद्यार्थ्यांनी केला. माजी राष्ट्रपती श्री अब्दुल कलाम यांचे 'अग्निपंख'तसेच श्री अच्युत गोडबोले यांच 'मुसाफिर' आणि विणा गवाणकर यांचे 'एक होता कार्व्हर' या पुस्तकाचे परिचय/ परीक्षण करून दिला गेला.

भालचंद्र नेमाडे यांची 'कोसला' ही कादंबरी तसेच द.मा.मीरासदार यांचे 'अंगत पंगत 'या पुस्तकांचा परिचय करून देण्यात आला. ७ जानेवारी रोजी ग्रंथालयात लेखक तुमच्या भेटीला या उपक्रमांतर्गत प्राचार्य डॉ.एम.जी लोणे यांच्या मार्गदर्शनानुसार पुरातत्व शास्त्राचे लेखक तसेच दक्षिण भारताचा इतिहास या पुस्तकाचे लिखाण करणारे प्रा.डॉ. दत्ता हिंगमिरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. ९ जानेवारी रोजी ग्रंथालय विभागातर्फे ग्रंथ प्रदर्शन आयोजित केले.

१० जानेवारी रोजी ग्रंथालय विभागातर्फे सामूहिक वाचन प्रकल्प राबविण्यात आला. ११ जानेवारी रोजी विद्यार्थ्यांना 'आठवणींचे मोती' हे व्हरा जीसिंग यांचे पुस्तक तसेच 'माझा साक्षात्कारी हृदयरोग' हे डॉक्टर अभय बंग यांचे पुस्तक या दोन पुस्तकांचा परिचय करून देण्यात आला.



**पनवेल : भाजप पुरस्कृत जय गणेश्वर क्रिकेट संघाच्या वतीने धानसर येथे आमदार चषक क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेला आमदार प्रशांत ठाकूर यांनी रविवारी भेट देत शुभेच्छा दिल्या. आयोजक भाजप तालुका मंडल चिटणीस सुरेश पोरजी, प्रभाग १ सरचिटणीस जितेंद्र पोरजी यांनी त्यांचे स्वागत केले. या वेळी विष्णू पोरजी, तुषार पोरजी, राकेश पोरजी, सुरज गोंधळी, राजेंद्र घरत, गुरूनाथ घरत, आशिष म्हात्रे, आदेश म्हात्रे आदी उपस्थित होते.**

# स्वामित्व योजनेची प्रभावी अंमलबजावणी करा

## मंत्री आदिती तटकरे यांचे अधिकाऱ्यांना निर्देश

**रायगड : रामप्रहर वृत्त**

केंद्रीय ग्रामविकास व पंचायतराज मंत्रालयामार्फत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते शनिवारी (दि.१८) दूरदृश्य प्रणालीद्वारे स्वामित्व योजनेंतर्गत सनद वितरणाचा शुभारंभ करण्यात आले. रायगड जिल्हास्तरीय कार्यक्रम महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत दूरदृष्यप्रणालीद्वारे झाला. या वेळी बोलताना त्यांनी स्वामित्व योजनेची प्रभावी अंमलबजावणी करा, असे निर्देश अधिकारीवर्गाला दिले.

या कार्यक्रमास खासदार धैर्यशील पाटील जिल्हाधिकारी किशन जावळे, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड, उपमुख्यकार्यकारी अधिकारी सत्यजित बडे, जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख, सुनील इंदुलकर, प्रकल्प संचालक ग्रामीण विकास, प्रियदर्शनी मोरे, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. शीतल जोशी यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी, रायगड जिल्ह्यातील लाभार्थी उपस्थित होते.





स्वामित्व योजनेद्वारे देशातील जनतेच्या उत्पन्नात वाढ होत असून यामुळे त्यांच्या आशा-आकांशा पूर्ण होत आहेत. या योजनेंतर्गत जनतेला देण्यात आलेल्या कायदेशीर सनदेमुळे त्यांना मदत होत आहे. या सनदेच्या आधारे बँकेतून कर्जाद्वारे जीवनमान उंचावण्यासाठी मदत होईल, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या वेळी सांगितले.

देशातील गरीबी कमी करायची असेल तर प्रत्येक नागरिकांजवळ मालमत्तेचे अधिकार असणे गरजेचे आहे, असे सांगून पंतप्रधान मोदी म्हणाले की, देशातील लाखभर लोकांकडे संपत्ती असूनही त्यास किंमत मिळत नव्हती. स्वतःचे घर असूनही काही लोक त्यावर कब्जा करत होते. २०१४पासून आम्ही देशातील नागरिकांचे ड्रोनद्वारे सर्व्हेक्षण करून त्यांना प्रॉपर्टी कार्ड वितरित करत आहोत. यामुळे लोकांचे जीवन बदलणार आहे.

स्वामित्व योजनेंतर्गत या प्रॉपर्टी कार्डमुळे देशातील भ्रष्टचार कमी होणार आहे. आज ९८ टक्के भूमी अभिलेखाचे संगणकीकरण करण्यात आले आहे. आज गावोगावी शौचालये, उज्वला गॅस, जलपुरवठा, आयुष्यमान, सडके, इंटरनेट, ब्रॉडबँड सोबत कॉमन सर्व्हीस सेंटर या सुविधा पुरविण्यात आल्या आहेत. शहरामध्ये मिळणाऱ्या सुविधा आता गावात मिळत आहे. देशातील गरीब सशक्त झाला तरच विकसित भारताचे स्वप्न पूर्ण होणार असल्याचे पंतप्रधान मोदी म्हणाले.

पंतप्रधान स्वामित्व योजनेच्या पथदर्शी प्रकल्पात रायगड जिल्ह्याचा समावेश आहे ही अतिशय कौतुकास्पद बाब आहे तसेच रायगड जिल्ह्याने अतिशय अल्पावधित प्रभावी काम केले आहे. ग्रामीण भागाचा विकास हा देशाच्या प्रगतीचा आधार आहे, ही जाणीव ठेवूनच स्वामित्व योजना आखण्यात आली आहे. ही योजना ग्रामीण भागाच्या आर्थिक प्रगतीसाठी महत्व पूर्ण आहे असे महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे यांनी सांगितले.

या वेळी खासदार धैर्यशील पाटील व जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी मनोगत व्यक्त केले. स्वामित्व योजनेंतर्गत खा. धैर्यशील पाटील आणि जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या हस्ते यांना सनद वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख सुनील इंदुलकर यांनी केले.

# प्लास्टिक पिशव्या वापरणाऱ्या व्यापाऱ्यांवर रोह्यात कारवाई

**रोहे : प्रतिनिधी**

रोहा नगर परिषदेने प्लास्टिक पिशवी वापरणाऱ्या ३९ व्यापाऱ्यांवर दंडात्मक कारवाई केली असून १९ किलो प्लास्टिक माल जप्त केला आहे.



शासनाने प्लास्टिकबंदी कायदा लागू केल्यानंतर रोहा अष्टमी पालिकेने सर्व व्यापारी बांधवांना प्लास्टिक पिशव्यांचा वापर करू नका, असे जाहीर आवाहन केले होते. तरीदेखील काही व्यापारी मंडळी प्लास्टिक पिशव्यांचा वापर करत असल्याची माहिती समजताच रोहा पालिकेचे मुख्याधिकारी अजयकुमार एडके यांनी प्रशासनाच्या अतिक्रमण आणि स्वच्छता, आरोग्य विभागाला धडक कारवाई करण्याचे आदेश दिले. स्वच्छता व आरोग्य निरीक्षक मनोज पुलेकर यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथक नेमून प्लास्टिक पिशव्यांचा वापर करणारे दुकानदार, पथविक्रेते, भाजीपाला विक्रेते अशा पद्धतीचे ३९ व्यापाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. अशा व्यापाऱ्यांकडून १९ हजार ५०० रुपये दंड स्वरूपात रक्कम वसूल करण्यात आली आहे.

**रोहा शहरातील नागरिक ७५ मायक्रोनपेक्षा जाडीची पिशवी किंवा कापडी पिशवी वापरत असून शहर सिंगल युझ प्लास्टिकमुक्त करीत आहोत. नागरिक व व्यापारी बांधवांनी नगर परिषद प्रशासनाला सहकार्य करावे.**

**–मनोज पुळेकर,**
**स्वच्छता व आरोग्य निरीक्षक,**
**रोहा नगर परिषद**

# रोह्यात ऑनलाईन प्रॉपर्टी कार्डवाटप

**धाटाव : प्रतिनिधी**

पंचायतराज व सर्वेक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने स्वामित्व योजनेंतर्गत संपूर्ण देशात ५० लाख लोकांना मालमत्ता पत्रक वितरण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ऑनलाईन कार्यक्रमात प्रदान करण्यात आले.



गावठाण हद्दीतील जागेचे ड्रोनच्या सहाय्याने सर्व्हे करण्यात आले होते. त्या गावातील लोकांना या कार्यक्रमात प्रॉपर्टी कार्ड देण्यात आले. या कार्यक्रमाकरिता रोहा तालुक्यातील कांदळे, ऐनघर, वरसे, शेणवई व तळाघर या गावांची निवड करण्यात आली होती. कांदळे येथे ग्रामपंचायत कार्यालयात हा कार्यक्रम झाला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रशासक रणजीत लवटे यांनी केले.

या कार्यक्रमात भूमी अभिलेख विभाग कार्यालयाचे अधिकारी उरडे यांनी कार्ड वितरणाबाबत महिती दिली. हे कार्ड प्राप्त झालेस जागेवरून होणारे वाद टाळणेस मदत होईल तसेच बँक कर्ज मिळणेकरिता सुलभता येईल, अतिक्रमण टाळता येईल अशी माहिती देण्यात आली. कार्यक्रमात मेरी पंचायत ॲपबाबत माहिती ग्रामपंचायत अधिकारी देसाई यांनी दिली.

ऑनलाईन कार्यक्रमात देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लोकांसोबत लाईव्ह पद्धतीने संवाद साधला तसेच योजनेबाबत मार्गदर्शन केले.

# स्वामित्व योजनेंतर्गत ६९ गावकऱ्यांना सनद प्रदान

**खालापूर, चौक : प्रतिनिधी**

स्वामित्व योजना गावठाण ड्रोन सर्वे अंतर्गत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सनद वाटप कार्यक्रम आयोजिला होता. त्याप्रमाणे खालापूर पंचायत समिती येथे कार्यक्रम झाला. या वेळी ६९ गावकऱ्यांना सनद प्रदान करण्यात आली.

खालापूर येथे झालेल्या कार्यक्रमास गटविकास अधिकारी कराड, भूमी अभिलेख उपअधीक्षक जरग, विस्तार अधिकारी तांडेल, मुख्यालय सहाय्यक उत्तम केंद्रे आदी उपस्थित होते.

मानकिवली ग्रामपंचायत येथील एकूण १३०पैकी ६९ लाभार्थ्यांना सनद वाटप करण्यात आली असून त्यांचा महसूल ६४,९०५ रुपये जमा झालेला आहे.



# जिल्हाधिकाऱ्यांची शेती प्रक्षेत्र भेट

**शेतकऱ्यांशी साधला संवाद**

**धाटाव : प्रतिनिधी**

जिल्हाधिकारी किशन जावळे यांचा नुकताच जिल्हा कृषी अधीक्षक वंदना शिंदे यांच्या समवेत रोहा तालुक्यातील किल्ला येथे भाजीपाला शेती प्रक्षेत्र भेट व पाहणी दौरा केला.



या दौऱ्यात तहसीलदार किशोर देशमुख, कृषी उपसंचालक प्रवीण ठिगळे, उपविभागीय कृषी अधिकारी शुभम बोराडे, तंत्र अधिकारी रविशंकर कावळे, नायब तहसीलदार राजेश थोरे, कृषी अधिकारी महादेव करे, मंडळ अधिकारी अमोल सुतार, विवेकानंद रिसर्चचे सुशील रुळेकर, दीपक फाऊंडेशनचे दीपक ठोसर, कृषी अधिकारी हेही सहभागी झाले होते. शेतकरी सुरेश शिद, विजय वारगुडे, सोनू शिद व इतर शेतकरी यांच्या शेती प्रक्षेत्रास भेट देऊन पाहणी करण्यात आली.

या वेळी जिल्हाधिकाऱ्यांनी पिकांची परिस्थिती, लागवड पद्धत, नियोजन व शेतमाल यांचे निरीक्षण केले तसेच शेतकऱ्यांशी संवाद साधला. शेतकऱ्यांनी पिकवलेल्या शेतमालाला चांगला भाव मिळावा यासाठी शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपनी तयार करावी व शेतमाल निर्यात करण्यासाठी त्यांना परवाना मिळवून देण्यासाठी प्रयत्न करावेत, अशा सूचना जिल्हाधिकारी यांनी संबंधितांना केल्या. विजेचा प्रश्न मिटविण्यासाठी सौर ऊर्जा युनिट बसवावे, त्यासाठी महावितरणकडून सहकार्य घ्यावे, असे आदेश दिले. जिल्हा कृषी अधीक्षक वंदना शिंदे यांनी सर्व योजनांचा पाठपुरावा करू, म्हटले.

# लज्जतदार कोळंबी सोड्यांचा न्यारा थाट!

## दर वाढले तरीही खवय्यांकडून मागणी कायम

**रेवदंडा : प्रतिनिधी**

सुके कोळंबीसोडे, मच्छी मार्केटला खवय्यांची मोठी मागणी असते. नित्याने पर्यटक, पै-पाहुणे, मुंबई, पुणे, ठाणे येथील चाकरमानी यांची सुकी मच्छी विक्रेत्यांकडे सुके सोडे खरेदीची मागणी असते. सुके कोळंबी सोडे विक्रीचा दर किलोस १२०० ते १५०० रुपये असा गगनाला भिडला आहे. तरीदेखील खवय्यांची मागणी कायम आहे.



कोळंबी सोड्याचा रस्सा मांसाहारी खवय्यांच्या खास आवडीचा. तिखट, झणझणीत बटाट घालून सुके कोळंबी सोडे रस्सा जेवताना चार घास जास्त पोटात घालावयास लावतो. स्थानिकांसह पर्यटक, पै-पाहुणे, मुंबई, पुणे, ठाणे येथील चाकरमानींची कोळंबी सोडे यांची सुकी मच्छी विक्रेत्यांकडे खरेदीला झुंबड असते.

मोठी कोळंबी सुकवून त्याचे सोडे बनवून कोळी बांधव-भगिनी विक्रीस ठेवतात. कोळंबी सोडे चांगला भाव मिळवून देत असल्याने थोडेसे अधिक कष्ट घेत जास्त रक्कम वसूली सुके कोळंबी सोडे देतात. त्यामुळे मोठी कोळंबी मिळाली की, सुके कोळंबी सोडे बनविण्यावर कोळी समाज भगिनी-बांधव अधिक लक्ष केंदित करतात.

कोळंबी सोडे विक्रीचा दर किलोस १२०० ते १५०० रुपये असा झाला आहे. तरीही कोंळबी सोडे खरेदीची मागणी मोठी असल्याचे आग्राव, थेरोंडा, कोर्लई येथील प्रसिद्ध मच्छी खरेदी विक्रेते व सुकी मच्छी व्यावसायिकांनी सांगितले. स्थानिकांसह पर्यटक, पै-पाहुणे, मुंबई, पुणे, ठाणे येथील चाकरमानी सुके कोळंबी सोडे खरेदीसाठी सुकी मच्छी विक्रेत्यांकडे गर्दी करीत असतात.

# अबॅकस स्पर्धेत नैतिक डवलेचे सुयश

**माणगाव : बातमीदार**

पुणे जिल्ह्यातील ओझर येथे झालेल्या १३व्या राष्ट्रीय पामा अबॅकस स्पर्धेत नैतिक नितीन डवले याने नेत्रदीपक कामगिरी करताना झेड-१ कॅटेगरीमध्ये प्रथम क्रमांक पटकावला. सध्या नैतिक सात वर्षाचा असून त्याने अबॅकसच्या दुसऱ्या टप्प्याचा अभ्यास पूर्ण केला असून



मागील एक वर्षांपासून नैतिक अबॅकस या विषयाचे प्रशिक्षण ॲप्पल लर्निंग सेंटर नेरूळ येथील स्टर्लिंग स्कूलमधील शाखेत घेत आहे. या यशात त्याच्या अबॅकसच्या शिक्षिका शुभांगी कदम यांचेही त्याला मार्गदर्शन लाभले. त्याचबरोबर आई जिज्ञासा यांनी खूप मेहनत घेतली. नितीनचे अभिनंदन व कौतुक होत आहे.

# दुर्गवीर प्रतिष्ठानचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

**माणगाव : बातमीदार**

महाराष्ट्रातील १६ किल्ल्यांवर संवर्धन करत असलेल्या दुर्गवीर प्रतिष्ठानचे वार्षिक स्नेहसंमेलन किल्ले मानगडापासून जवळच असलेल्या हरवंडी गावातील शांतीनिवास वृद्धाश्रम येथे मोठ्या उत्साहात झाले.



महाराष्ट्र आणि बेळगाव सीमाभागातील साधारण दोनशे दुर्गवीर या स्नेहसंमेलनामध्ये सहभागी होते. सिनेअभिनेता अमोल देसाई यांनी दुर्गवीर परिवारातील महिलांसाठी खेळ पैठणीचा या मनोरंजनात्मक कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन करून उपस्थितांची मने जिंकली. सहभागी स्पर्धक महिलांमधून पैठणीच्या मानकरी रंजना रामजी कदम, सोनाली विठ्ठल केंबळे आणि अन्वी विजय गर्जे या ठरल्या.

शांतीनिवास वृद्धाश्रमाच्या मुख्य सभागृहात सुप्रसिद्ध वीरगळ अभ्यासक अनिल दुधाने यांचे महाराष्ट्रातील वीरगळांबद्दल माहितीपूर्वक व्याख्यान झाले. स्नेहसंमेलनाचे उद्घाटक रायगडभूषण सुशील कदम यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. रायगड जिल्ह्यातील मानगड, सूरगड आणि मृगगड किल्ल्यावरील श्रमदान मोहिमांची उत्कृष्ट चित्रफीत दुर्गवीर सुयोग पाटील आणि शिलेदार सिद्धांत शिंदे यांनी उपस्थितांना दाखवली. प्रतिष्ठान सदस्यांच्या गडसंवर्धन कार्याचे कदम यांनी कौतुक केले. स्नेहसंमेलनाच्या शेवटी प्रतिष्ठानचे अध्यक्ष संतोष हसुरकर यांनी मार्गदर्शन केले.

प्रतिष्ठानच्या वार्षिक स्नेहसंमेलनासाठी नंदू चव्हाण, नितीन सकरे, भालचंद्र खाडे, तुषार गांगुर्डे उपस्थित होते. प्रास्ताविक इतिहास अभ्यासक दुर्गवीर रायगड जिल्हाप्रमुख रामजी कदम यांनी केले. संपूर्ण स्नेहसंमेलन यशस्वी करण्यासाठी स्थानिक दुर्गवीर तालुकाप्रमुख विठ्ठल केंबळे, समन्वयक प्रमोद डोंगरे, अजित लाखाडे, शिलेदार शिंदे, स्वप्नील खाडे, कल्पेश सागवेकर, रवींद्र रावराणे, प्रशांत डिंगणकर, सुरेश उंडरे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# शिशिराची पानगळ आणि वसंताची चाहूल!

वसंत, ग्रीष्म, वर्षा, शरद, हेमंत, शिशिर हे भारतीय ऋतू निसर्गातील विविध बदलांची नांदी देतात. बारा महिन्यातील विभागून ऋतूचक्र सांगणारे हे ऋतू निसर्गाची विविध रूपे समोर आणतात. हिंदू दिनदर्शिकेप्रमाणे मार्गशीर्ष आणि पौष या महिन्यात शिशिर ऋतू असतो. म्हणजेच डिसेंबर महिन्याचा उत्तरार्ध, जानेवारी महिना व फेब्रुवारी महिन्याच्या पूर्वार्धात शिशिर ऋतू असतो. या ऋतूचे वैशिष्ट्य म्हणजे झाडांची पानगळ सुरू झाली की शिशिर ऋतू सुरू झाला असा जनमानसात समज आहे. या वर्षी मात्र नोव्हेंबर महिन्याच्या ८ तारखेपर्यंत लांबलेल्या पावसाने निसर्गाचे चक्र पूर्णपणे बदलवून टाकले होते, मात्र ठराविक काळानंतर येणारे ऋतूचक्र सतत सुरू असून शिशिर ऋतूने पानगळीला सुरूवात केली आहे.



मोठ्या पानांच्या झाडांची पाने या ऋतूत गळतात. झाडे पूर्णपणे निष्पर्ण होतात. काहीसं भकास उदास असं माळरानाचं चित्र या ऋतूत दिसून येते. निसर्गाला नवे रूप देणारा हा ऋतू शेती आणि शेतकऱ्यांच्या दृष्टीनेही महत्त्वाचा मानला जातो. जानेवारी-फेब्रुवारी महिन्यात असणारा हा ऋतू थंडीचा ऋतू म्हणूनही ओळखला जातो. या वर्षी मात्र या ऋतूत जाणवणारी थंडी गायब झाली आहे. दरवर्षीप्रमाणे जाणवणारा गारवा हरवला आहे, मात्र या शिशिराची पानगळ झाली असून झाडांची पाने पिवळीगर्द होऊन गळण्यास सुरूवात झाली आहे. काहीसा उदास वाटणारा हा ऋतू गारवा, थंडी आणि पानगळ घेऊन येतो. या ऋतूतील सणही ऋतूमानाचा विचार करून आहार विहार देतात. मकरसंक्रात हा त्यातीलच महत्त्वाचा सण. उत्तम आरोग्यासाठी स्निग्ध पदार्थ खाण्याचा, थंडीचे कपडे, हलका व्यायाम आणि आरोग्यदायी आहार सांभाळून या ऋतूत आरोग्याची काळजी घेतली जाते. झाडांची झालेली पानगळ शेतकऱ्यांना राब देऊन जाते. झाडांचा गळलेला हाच पालापाचोळा शेतकरी शेतीसाठी वापरतात.

निसर्गाला नवे अंकुर देणारा 'जुनं जाऊ द्या मरणालागूनी' म्हणणारा हा ऋतू वसंताची चाहूल देतो. निष्पर्ण झालेल्या फांदीतून रंगीबेरंगी फुलांचे गुच्छ याच ऋतूच्या अखेरीस पहावयास मिळतात. एका अर्थाने नवसर्जनास पार्श्वभूमी निर्माण करणारा विरक्तीचा संदेश देणारा हा ऋतू वसंताची चाहूल देतो. या ऋतूतच रानोमाळ आंब्याच्या, काजूच्या मोहोराचा घमघमाट येत राहतो. करवंदीच्या जाळीमधून पांढरीशूभ्र फुले डोकावतात आणि पांगिरा, फळस, चाफा इ. असंख्य झाडे पुष्पगुच्छांची बरसात करतात. या ऋतूच्या उत्तरार्धात सुरू होतो तो सृष्टीचे नवचैतन्य बहरणारा वसंत-हृदयी वसंत फुलताना... हृदयी वसंत फुलताना... हे मराठी चित्रपटातील गीत ऐकले नाही असा मराठी माणूस आणि वसंत ऋतूत फुलांचा बहर अनुभवला नाही असा निसर्गप्रेमी शोधून सापडणार नाही. चैत्र आणि वैशाखाचे महिने म्हणजे वसंत ऋतू भरपूर उन्हाने अंगाची लाही लाही करणारे इंग्रजी मार्च, एप्रिल आणि मे महिन्याचा काळ म्हणजे वसंत ऋतू.



सतत घामाच्या धारा शरीरावाटे बाहेर काढणाऱ्या या महिन्यात सूर्यदेवता सर्व प्राण्यांना आणि निसर्गाला मुक्त हस्ते भरपूर सूर्यप्रकाश देते. याच सूर्यप्रकाशात निसर्गाची मुक्त हस्ते उधळण होते. अवनीवर वसंताचे आगमन होते. भरपूर सूर्यप्रकाश मिळाल्याने रानावनाला बहर येतो. शिशिरात निष्पर्ण झालेली वनदेवता हिरव्या कोंबात येते. हिरव्या पानांच्या वनस्पती बहारदार अशी फुलांची उधळण करतात. लाल, पिवळी, केशरी, जांभळी, पांढरी अशा कितीतरी रंगांची फुलं माळराणी फुलून येतात. पळस, पांगारा, शेवरी, गुलमोहोर नखशिखांत बहरून येतो आणि पाहणाऱ्याचे हृदय वसंताने फुलून येते. माणसांनाच नाही तर विविध प्रकारच्या कीटकांना, पक्षांना आणि भुंग्यानाही या बहरलेल्या वनस्पती मोहिनी घालतात आणि हे सर्व या ऋतूत फुलांच्या सहवासात राहतात. हा ऋतू नुसताच फुलांचा बहर देत नाही तर अनेक रानभाज्यांनाही जन्म देतो, कुढ्याच्या पांढऱ्या फुलांचा बहरही दिलखेचक असतो आणि या फुलांच्या भाजीचा स्वाद जिभेवर रेंगाळणाराच ठरतो. चाफा तर खंत न करताच सारे सौंदर्य उधळतो. दुधाळ पांढरा मध्येच पिवळसर छटा आणि त्याच्या पकळ्या देवघरात कधी पोहचतात हेच कोणाला कळत नाही. गावकुसाबाहेर सौंदर्य उधळणारा हा ऋतू खऱ्या अर्थाने ऋतूंचा राजा आहे, कारण गावकुसाबाहरची ही फुलं निसर्गाचे गाणे गात गात पावसाचे स्वागत करतात.

अशा या दोन ऋतूंचा काल मनभावन व मनभावक असाच असतो. उत्तम आरोग्य, निसर्गाची बरसात, सणांची मांदियाळी याच ऋतूत अनुभवास येते. शिशिराच्या पानगळीतून नवी पालवी बहरास येते. देणे निसर्गाचे म्हणत या दोन्ही ऋतूंचा अनुभव घेऊया.

**–शब्दांकन : सलीम शेख, माणगाव**

# भारतीय महिलांची दणदणीत सलामी

## टी-२० वर्ल्डकपमध्ये वेस्ट इंडिजचा उडवला धुव्वा

**क्वालालमपूर : वृत्तसंस्था**

भारतीय महिला क्रिकेट संघाने १९ वर्षांखालील टी-२० विश्वचषक सामन्यात विजयी सलामी देत मोहिमेला दणक्यात सुरुवात केली आहे. टीम इंडियाने वेस्ट इंडिजचा नऊ विकेट्सने धुव्वा उडवला. विंडीजने दिलेले माफक आव्हान भारतीय संघाने अवघ्या २६ चेंडू गाठत विजयी सलामी दिली.

अंडर-१९ टी-२० विश्वचषकातील पहिल्याच सामन्यात वेस्ट इंडिजने प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला, पण भारतीय गोलंदाजी आक्रमणामुळे संघ संपूर्ण २० षटकंही खेळू शकला नाही. वेस्ट इंडिजचा संपूर्ण संघ १३.२ षटकांत ४४ धावा करत ऑलआऊट झाला. ही त्यांची स्पर्धेच्या इतिहासातील सर्वात कमी धावसंख्या होती. अशारितीने भारताला विजयासाठी ४५ धावांचे लक्ष्य



मिळाले होते, जे भारताने केवळ ४.२ षटकांत एक गडी गमावून पूर्ण केले.

४५ धावांच्या सोप्या लक्ष्याचा पाठलाग करताना भारताने चार धावांवर आपली पहिली एकमेव विकेट गमावली, मात्र त्यानंतर भारतीय फलंदाजांनी वेस्ट इंडिजला विकेट घेण्याची दुसरी संधी दिली नाही. कमलिनी आणि सानिका चाळके यांच्यात दुसऱ्या विकेटसाठी ४३ धावांची नाबाद भागीदारी झाली. कमालिनीने १६, तर सानिकाने १८ धावांची खेळी करत संघाला ४.२ षटकांत सहज विजय मिळवून दिला.

भारताच्या गोलंदाजांनी उत्कृष्ट कामगिरी करत विजयात मोठा वाटा उचलला. पारूनिका सिसोदिया हिने तीन विकेट्स, तर जोशिता आणि आयुषी शुक्ला यांनी प्रत्येकी दोन विकेट्स घेतले. याशिवाय वेस्ट इंडिजचे तीन खेळाडू धावबाद झाले.

क्वालालमपूरमधील खराब हवामानामुळे, भारताने सुरुवातीपासूनच लक्ष्याचा पाठलाग करताना फलंदाजी धारदार ठेवली. याचा उल्लेख भारतीय कर्णधार निकी प्रसादनेही सामन्यानंतर केला. ती म्हणाली की, आम्हाला सामना लवकरात लवकर संपवावा, अशी स्पष्ट सूचना संघ व्यवस्थापनाकडून देण्यात आली होती आणि आम्ही तेच केले. भारताच्या विजयात जोशीथाला सामनावीर म्हणून निवडण्यात आले.

# राज्यस्तरीय किक बॉक्सिंग स्पर्धेत आर्या मानेला 'सुवर्ण'



**नवी मुंबई : बातमीदार**

राज्य क्रीडा व युवक संचालनालय, राज्य व जिल्हा क्रीडा कार्यालय सातारा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय शालेय किक बॉक्सिंग स्पर्धेचे आयोजन सातारा येथील श्रीमंत छत्रपती शाहू जिल्हा क्रीडा संकुलात करण्यात आले होते. या स्पर्धेत नवी मुंबई महापालिकेच्या सीवूड्स येथील सीबीएसई शाळा क्रमांक ९३मधील विद्यार्थिनी आर्या सचिन माने हिने सुवर्णपदक पटकाविले. तिची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

आर्या मानेने १४ वर्षाखालील वयोगट व २४ किलो खालील वजनी गटात चुरशीची लढत देत बाजी मारली. आर्याला क्रीडा प्रशिक्षक सुधाकर आलदर यांचे मार्गदर्शन लाभले. राज्य स्पर्धेत सुवर्णपदक व राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल आर्याचे कौतुक व अभिनंदन होत असून अनेकांनी तिला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# कर्नाटकने पाचव्यांदा जिंकली विजय हजारे ट्रॉफी : विदर्भ संघाचे स्वप्न भंगले!

**बडोदा : वृत्तसंस्था**

विजय हजारे ट्रॉफी स्पर्धेतील फायनल लढतीत मयंक अग्रवालच्या कर्नाटक संघाने विदर्भ संघाला पराभूत करत पाचव्यांदा विजय हजारे ट्रॉफीवर नाव कोरले आहे. फायनलमध्ये पोहचलो की ट्रॉफी आमचीच हे पुन्हा एकदा कर्नाटक संघाने दाखवून दिला.

बडोदा क्रिकेट असोसिएशनच्या कोटांबी स्टेडियमवर शनिवारी रंगलेल्या फायनल लढतीत पहिल्यांदा बॅटिंग करताना कर्नाटकच्या संघाने निर्धारित ५० षटकात ६ बाद ३४८ धावा केल्या होत्या. या धावांचा पाठलाग करताना पहिल्यांदाच फायनल खेळणारा विदर्भ संघ ४८.२ षटकात ३१२ धावांवर आटोपला. कर्नाटक संघाने ३६ धावांनी सामना जिंकत यंदाच्या हंगामाच्या ट्रॉफीवर आपले नाव कोरले.

विदर्भ संघाने टॉस जिंकून पहिल्यांदा गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. कर्नाटकचा कर्णधार मयंक अग्रवालने देवदत्त पडिक्कलच्या साथीने संघाच्या डावाची सुरुवात केली. धावफलकावर अवघ्या २३ धावा असताना देवदत्त ८ (१९)च्या रूपात कर्नाटक संघाला पहिला धक्का बसला. त्याची जागा घेण्यासाठी मैदानात उतरलेल्या अनिश २७ चेंडूत २३ धावा करून माघारी



फिरला. त्याच्यापाठोपाठ कर्नाटकच्या संघाने मयंकची विकेटही गमावली. कर्नाटकच्या कर्णधाराने ३८ चेंडूत पाच चौकाराच्या मदतीने संघाच्या धावसंख्येत ३१ धावांची भर घातली.

पहिल्या तीन विकेट्स स्वस्तात माघारी फिरल्यावर समरन रविचंद्रन आणि क्रिशनन श्रीजित ही जोडी जमली. दोघांनी चौथ्या विकेटसाठी १६० धावांची भागीदारी करत संघाचा डाव सावरला. क्रिशनन याने ७४ चेंडूत नऊ चौकार आणि एक षटकाराच्या मदतीने ७८ धावा केल्या. दुसऱ्या बाजूला समरन याने शतक साजरे केले. त्याने ९२ चेंडूत सात चौकार आणि तीन षटकाराच्या मदतीने १०१ धावांची दमदार खेळी केली. अखेरच्या षटकात अभिनव मनोहरच्या भात्यातून तुफान फटकेबाजी पहायला मिळाली. त्याने ४२ चेंडूत १० चौकार आणि चार षटकाराच्या मदतीने ७९ धावा केल्या. हार्दिक राज पाच चेंडूत १२ आणि श्रेयस गोपाळ याने चार चेंडूत नाबाद तीपन धावांची खेळी करत कर्नाटकच्या संघाच्या धावफलकावर निर्धारित ५० षटकात ३४८ धावा लावल्या. विदर्भ संघाकडून दर्शन नलकांडे आणि भुटे यांनी प्रत्येकी दोन विकेट्स घेतल्या. याशिवाय यश ठाकूर आणि यश कदम याला एक विकेट मिळाली.

कर्नाटकच्या संघाने सेट केलेल्या ३४९ धावांचा पाठलाग करताना विदर्भ संघाची सुरुवात खराब झाली. धावफलकावर ३२ धावा असताना यश राठोडच्या रूपात विदर्भ संघाला पहिला धक्का बसला. हा सलामीवीर १९ चेंडूत २२ धावा करून परतला. विजय हजारे ट्रॉफी स्पर्धेत सर्वाधिक धावा करणारा विदर्भ संघाचा कॅप्टनही या सामन्यात फार मोठी खेळी करू शकला नाही. प्रसिद्ध कृष्णाने करुण नायरला २७ धावांवर बाद केले. यश कदम १५ (२०), जितेश शर्मा ३४ (४३), शुभम दुबे ८ (१४) अपूर्व वानखेडे १२ (११) ही मंडळी स्वस्तात माघारी फिरली.

सलामीवर ध्रुव शौर्य याने १११ चेंडूत आठ चौकार आणि दोन षटकाराच्या मदतीने ११० धावा केल्या. अखेरच्या षटकात हर्ष दुबेने तुफान फटकेबाजी करत विदर्भ संघाच्या आशा पल्लवित केल्या होत्या, पण ३० चेंडूत पाच चौकार आणि पाच षटकारासह ६३ धावांवर त्याची खेळी थांबली अन् ही मॅच कर्नाटकने जिंकली.

# अवघ्या २३ धावांवर संपूर्ण संघ ऑलआऊट

## श्रीलंकेविरुद्ध मलेशियावर ओढावली नामुष्की

**क्वालालंपूर : वृत्तसंस्था**

आयसीसी अंडर-१९ महिला टी-२० विश्वचषकात श्रीलंकेने यजमान मलेशियाचा १३९ धावांनी पराभव करत शानदार सुरुवात केली. प्रथम फलंदाजी करताना श्रीलंकेने मलेशियासमोर विजयासाठी १६३ धावांचे लक्ष्य ठेवले होते. प्रत्युत्तरात यजमान संघ अवघ्या



२३ धावांवर ऑलआउट झाला.

सामन्यात मलेशियाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. श्रीलंकेने धमाकेदार सुरुवात करीत पॉवरप्लेमध्येच दोन विकेट गमावून ५२ धावा केल्या. दहमी सनेथामाने ५५ धावा केल्या. तिच्याशिवाय सलामीवीर संजना कविंदीने १३ चेंडूत ३० धावा केल्या. श्रीलंकेने निर्धारित २० षटकांत सहा गडी गमावून १६२ धावा केल्या.

श्रीलंकेच्या गोलंदाजांविरुद्ध मलेशियन फलंदाज एकामागून एक बाद होत राहिल्या. त्यांच्यापैकी कोणीही दुहेरी आकडाही गाठू शकल्या नाही. संघ २३ धावांवर गारद झाला.



पनवेल : टीआयपीएल रोटरी प्रीमियर लीगला आमदार प्रशांत ठाकूर यांनी रविवारी कळंबोली येथील मैदानावर जाऊन शुभेच्छा दिल्या. या वेळी रोटरी क्लब आणि लीगच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांचे स्वागत केले.





पनवेल : शिवकर ग्रामपंचायत हद्दीत करण्यात येणाऱ्या तब्बल दोन कोटी ८२ लाख ६७ हजार रुपयांच्या विकासकामांचे भूमिपूजन पनवेल विधानसभा मतदारसंघाचे कार्यसम्राट व लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर आणि भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते रविवारी करण्यात आले. या वेळी त्यांच्यासह अन्य उपस्थित मान्यवर, पदाधिकाऱ्यांनी बुद्ध विहारात तथागत गौतम बुद्ध आणि भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पमाला अर्पण करून अभिवादन केले.

# रोहित, जडेजासह अनेक खेळाडू रणजी ट्रॉफी खेळणार

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

चॅम्पियन्स ट्रॉफी आणि इंग्लंडविरुद्धच्या तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेपूर्वी भारतीय संघातील अनेक स्टार खेळाडू देशांतर्गत क्रिकेट खेळताना दिसतील. भारतीय क्रिकेट नियामक मंडळ अर्थात बीसीसीआयच्या नवीन आदेशानंतर हे घडत आहे. बीसीसीआयने सर्व क्रिकेटपटूंना देशांतर्गत क्रिकेट खेळणं बंधनकारक केलंय, मात्र जर एखादा खेळाडू जखमी झाला किंवा प्रशिक्षक आणि व्यवस्थापन त्याला खेळू देऊ इच्छित नसेल तर त्याला सूट दिली जाईल.

आता रोहित शर्मा, रवींद्र जडेजा, ऋषभ पंत, यशस्वी जयस्वाल, शुबमन गिल आणि श्रेयस अय्यर सारखे खेळाडू २३ जानेवारीपासून रणजी ट्रॉफीमध्ये खेळणार आहेत, मात्र ऑस्ट्रेलियामध्ये पाच सामन्यांची कसोटी मालिका खेळणारे विराट कोहली आणि केएल राहुल रणजी ट्रॉफी खेळणार नाहीत. विराटने मानेच्या दुखण्यामुळे पहिल्या सामन्यातून विश्रांती घेतली आहे, तर केएल राहुल ऑस्ट्रेलियाच्या दीर्घ दौऱ्यावर होता. तो ३० जानेवारीपासून बंगळुरूमध्ये खेळल्या जाणाऱ्या दुसऱ्या सामन्यासाठी उपलब्ध असेल.









दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com